# माणूस

शनिवार । ४ जुलै १९८१ । एक रुपया


## केसरी दि. २५ जून व २७ जून

दि. २७ जूनचा ‘ केसरी ’ चा अग्रलेख मननीय आहे. ‘ हा भस्मासुर कोणी पोसला?’ असा या अग्रलेखाचा मथळा आहे व दत्ता सामंतपद्धतीच्या, केवळ आर्थिक लाभ पदरात पाडून घेण्यासाठी चाललेल्या व कुठलेच वैचारिक अधिष्ठान वा बांधिलकी न मानणाऱ्या कामगार चळवळीवर त्यात टीका आहे. कामगार चळवळीला असे वैचारिक अधिष्ठान हवे असेही केसरीकारांना वाटत असावे असे या लेखावरून दिसते. म्हणूनच त्यांनी सामंतप्रणीत कामगार चळवळीला ‘ भस्मासुर ’ म्हटले आहे व या भस्मासुराला पाठिंबा देणाऱ्यांचा उद्धार आपल्या लेखात केलेला आहे.

प्रश्न असा की, दोनच दिवसांपूर्वी, दि. २५ जूनचा अग्रलेख लिहिताना केसरीकारांना या वैचारिक अधिष्ठानाचे महत्त्व का पुरेसे जाणवू नये ? दि. २५ जूनच्या अग्रलेखाचा मथळा आहे ‘ माजगावकर आणि वर्तमानपत्रे ’ या अग्रलेखात केसरीकारांनी, माजगावकरांनी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या चाळिसाव्या वर्धापन दिनानिमित्त केलेल्या भाषणाची दखल घेतलेली आहे. पण ‘ दखल घ्यायला हवी ’ असे एकदा म्हणून सगळा अग्रलेख मात्र उखाळ्यापाखाळ्या काढत भलतीकडेच भरकटत नेला आहे. जी खंत केसरीकारांनी कामगार चळवळीच्या संदर्भात दि. २७ जूनच्या अग्रलेखात व्यक्त केली तोच माजगावकरांच्या पत्रकार संघाच्या भाषणातील मुख्य विषय होता. सगळ्याच क्षेत्रात वैचारिक अधिष्ठानाची आवश्यकता आज का भासेनाशी झाली आहे, मूल्यहीनता का फोफावते आहे, आदर्शांचे अवमूल्यन का होते आहे याचा शोध घेण्याचा माजगावकरांनी आपल्या भाषणात प्रयत्न केला व आदर्शांना सोडचिठ्ठी देण्याच्या लाटेत वृत्तपत्रेही कशी वाहत चालली आहेत व यामुळे त्यांचे लोकशिक्षणाचे, समाजाच्या आघाडीवरचे स्थान ढळून त्यांची पिछाडीच्या, लोकानुनयाच्या स्थानाकडे कशी घसरगुंडी सुरू आहे, हे काही उदाहरणे देऊन त्यांनी सांगितले. आता केसरीकारांना विचारांच्या अधिष्ठानाचे महत्त्व जाणवत असेल तर त्यांनी माजगावकरांनी घेतलेल्या शोधावर काही भाष्य करायला हवे किंवा आपली काही वेगळी कारणमीमांसा असेल तर ती सुसंगतरीत्या मांडायला हवी. त्याऐवजी २५ जूनचा ‘ माजगावकर आणि वर्तमानपत्रे ’ हा सगळा अग्रलेख जळफळाट आणि फुसकी टोलेबाजी यातच खर्ची पडलेला आहे. जे विचारवंत बुद्धिवादी इंदिरा गांधींचा ‘ महाराणी ’,‘ बाई ’ किंवा ‘ दिल्लीश्वर ’ असा उल्लेख करतात, जे आपल्या वृत्तपत्रातून बातम्यांना इंदिराद्वेषाची खमंग फोडणी देतात त्यांच्याबद्दलचा केसरीकारांचा जळफळाट काही नवीन नाही. केसरीकारांनी या विचारवंतांचे किंवा वृत्तपत्राचे नाव घेतले नाही तरी

सर्वसामान्य वाचकाच्या डोळ्यांसमोर म. टाइम्सचे नाव चटकन् येऊन जाते. या जळफळाटानंतरचा उर्वरित भाग माणूस आणि माजगावकरांच्या नसलेल्या शाली ओढून काढण्यात खर्च झालेला आहे. हा प्रयत्न किती अर्धवट माहितीवर आधारित आहे याचे एकच उदाहरण पुरेसे आहे.

केसरीकारांनी लिहिले आहे–' जनतापक्षाच्या राजवटीत इंदिरा गाधींना सूडबुद्धीने वागविले गेले, तर त्याचा फायदा इंदिरा गाधींनाच होईल आणि इंदिरा गांधींना नेमके तेच हवे आहे, असे सांगणे हे जनतापक्षाच्या हिताचे होते की, इंदिरा गांधीच्या ? पण केसरीने तसे सुचवताच हेच माजगावकर ' बरोबर आहे, इंदिरा गांधींना काय हवे, ते यांनाच कळणार ', असा शाब्दिक टोला मारण्यात स्वत:ला धन्य समजत होते."

वास्तविक इंदिरा गाधींना सूडबुद्धीने वागवू नये हे जनता पक्ष सत्तेवर आल्या दिवसापासूनच ' माणूस 'ने म्हटलेले आहे. इतकेच नव्हे तर या द्वेषभावनेची, सूड-वृत्तीची परिणती इंदिरा पुनरागमनातही होऊ शकते हे सांगणारे लेख असलेला खास इंदिरा गांधीवरचा ' रायबरेली विशेषांक ' ' माणूस 'ने जनता राजवट सुरू झाल्याझाल्या लगेचच काढला होता. (माणूस १० सप्टेंबर १९७७) पण हे सांगण्यात जनता पक्षाच्या द्वेषाची खमंग फोडणी मात्र नव्हती. ती केसरीकारांच्या सांगण्यात आल्याबद्दलचा तो शाब्दिक टोमणा होता. केसरीकारानी या टोमण्याची परत-फेड करण्यापूर्वी संदर्भ नीट तपासून पाहिले असते तर निदान थोडी गमत तरी वाटून घेता आली असती.

शरद जोशी याच्या शेतकरी आदोलनावर केसरीकारांनी पूर्वी, हल्ला चढवला. हा हल्ला पढिक रशियाछाप डाव्या विचारांवर आधारित होता असे ' माणूस 'ने म्हटले. तो विषय २५ जूनच्या अग्रलेखात उगाचच ओढूनताणून आण-ण्यात आलेला आहे. क्षणभर चर्चेसाठी गृहीत धरू की, शरद जोशी यांच्यामुळे फक्त श्रीमंत शेतकऱ्यांचेच भले झाले. आता यशवंतराव चव्हाण, शरद पवार हे महा-राष्ट्रातील श्रीमंत शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करतात हे तर केसरीकारानी अनेकदा म्हटलेले आहे. मग अशा श्रीमत शेतकऱ्याच्या प्रतिनिधींना गोरगरीब आणि अल्पसख्य यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इदिरा काँग्रेसमध्ये ओढून आणण्या-साठी केसरीकारानी एवढा आटापिटा का चालवला होता ? पवार किंवा यशवंतराव अरस काँग्रेसमध्ये राहिले काय किंवा इदिरा काँग्रेसमध्ये गेले काय केसरीच्या डोळयां-समोरील तळागाळातल्या जनतेच्या सुखदु:खात त्यामुळे काय फरक पडतो ?

वैचारिक अधिष्ठान नाही म्हणून केसरीकार सामत-प्रणीत कामगार चळवळ धोकादायक म्हणणार. वैचारिक अधिष्ठान नसलेल्या राजकीय हालचालींना किंवा जोशी-अभ्यंकर खून खटल्यासारख्या सनसनाटी विषयाना एकांगी व वारेमाप प्रसिद्धीही देणार ! अशा नव्या प्रसिद्धीतत्रा-मुळे वृत्तपत्रांची विश्वासार्हता कमी होत आहे, खप आणि विषयाची व्याप्ती वाढली तरी लोकशिक्षणाचे कार्य पूर्वी-प्रमाणे त्याच्याकडून होत नाही, असे माजगावकरांनी आपल्या भाषणात सागितले. ' वैचारिक बधीरता ' सर्व समाजात फैलावते आहे, त्याचाही हा वृत्तपत्रावर झालेला परिणाम असू शकतो, असेही माजगावकर म्हणाले. पण माजगावकरांचे सगळे म्हणणे-सांगणे नजरेखालून घालण्याचे कष्ट केसरीकारांनी घेतले नसावे. नाहीं तर मूळ विषय सोडून सगळा अग्रलेख चुकीच्या टोल्या आणि टोमण्यात त्यांनी का खर्च केला असता ?

—श्री. ग. मा.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : पाचवा

४ जुले १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मुंबई वार्ता

# ताजमहाली रोटेरियन्ससह दिग्दर्शिका

मागच्या आठवड्यात एअरकंडिशण्ड ताज-महाल हॉटेलमध्ये एक आलिशान आणि थंडगार परिसंवाद 'पार' पडला. 'अलिशान' म्हणायचं कारण असं की, तो आयोजित करणारी संस्था 'रोटरी क्लब ऑफ मिडटाउन' सारखी प्रतिष्ठित होती आणि 'थंडगार' म्हणायचं कारण असं की... असो! चालायचंच! कदाचित वातावरणातल्या गारव्याचा तो परिणाम असावा. भर दुपारी सव्वा वाजता (ही आपली छापील वेळ) सर्व रोटरीयन्स आपली 'मिड-डे मील्स' वगैरे तिथेच घेऊन मोकळी झाली, तेव्हा कार्यक्रमाला सुरुवात झाली. समोर प्रेक्षकासाठी जितक्या खुर्च्या, जवळजवळ तितक्याच व्यासपीठावर! मग एकीकडे टेबला-टेबलावर रंगणाऱ्या बिझनेसच्या कुजबुजत्या चर्चा आणि समोर चाललेला कार्यक्रम. विषय: 'स्त्री चित्रपट दिग्दर्शिका!' प्रमुख पाहुण्या आणि व्याख्यात्या सई परांजपे.

ताजमहाल. शहाजननं बांधलेला आणि मुंबईतला गेट वेसमोरचा. एक परदेशी प्रवाशासाठी आकर्षण, तर दुसरं आश्रयस्थान. सर्वसामान्य मुंबईकर आम्याच्या ताजमहालात कधी तरी का होईना, जाऊ शकेलही कदाचित; मात्र या ताजमहालात पाऊल ठेवणं हे खरोखरच स्वप्न असतं सर्वसामान्यांसाठी! ताजमहाल म्हणजे आलिशान, खानदानी रुवाब. उंच, भव्य काचेच्या खिडक्यांवर झुलणारे पडदे, मऊशार मखमली गालिचे, देखणे वॉलपेपर्स. उंची शँडेलियर्समधून झरणारा सौम्य, नितळ प्रकाश. वातावरणातली सुखद शीतलता. समुद्र सुखानं पहायला ताजच्या सीलाऊंजमध्ये बसायला हवं. कारण मुंबईतल्या गरीब माणसाला पैसे खर्च न करता मिळणारं समुद्राचं, मऊ स्वच्छ वाळूचं सुखही नशिबी नाही! गिरगाव, दादर चौपाटयांची वाळू ही सुखी माणसाच्या सदऱ्यासारखी इथे मात्र समोर सफपणे हेलकावणार! अथांग समुद्र. इथल्या दालनात मिडटाउनर्स शांतपणे समोरच्या खाद्य-पेयाचा समाचार घेत, नक्षीदार चषकामधून बिअरचे घोट घेत बसले आहेत!

अपंग वर्षानिमित्त अपंगांना कृत्रिम अवयवांचं वितरण आणि मग परिसंवाद असा एकत्र कार्यक्रम. सुरुवातीला 'आता कार्यक्रमाला ('विच इज अबाउट द मोस्ट इंटरेस्टिंग टॉपिक' असं आश्वासन) वेळ कमी पडेल' असं जाहीर माफक दु:ख झेवियर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे प्रिन्सिपॉल फादर स्मिथ यानी खरं म्हणजे प्रश्न चांगले विचारले; पण या माणसांचा गांभीर्यानं विचार करायचा नाही असंच सई पराजप्यानी ठरवलं असावं. कारण बोलून-चालून क्लबच्या वार्षिक अहवालात काही लिहिता यावं या खोगीरभरती हिशेबानं ठेवलेला हा दिखाऊ कार्यक्रम असं त्याना वाटलं असावं. आजपर्यंत 'स्त्रिया चित्रपट मार्गदर्शनाकडे का वळल्या नाही हो?'

'त्या आतापर्यंत चूल आणि मूल सोडून काहीच करत नव्हत्या, तसं चित्रपट-दिग्दर्शनही करत नव्हत्या,' असं सरळसोट उत्तर.

'बरं मग तुम्हाला काही त्रास, असहकार वगैरे?'

'छे, मुळीच नाही!'

'तुम्ही स्त्री म्हणून तुमचे चित्रपट वेगळे असतात का?'

'त्यात काय वेगळं असायचंय?'

'तुमच्या पुरुष सहकाऱ्यांबरोबर तुम्हाला काही एंबॅरेसिंग अनुभव वगैरे?'

'मला तर नाही, पण त्यांनाच अवघड वाटलं असावं!' मग प्रेक्षकांतून एक भाबडा प्रश्न (जो सर्व साहित्यिक कलाकारांना नेहमीच विचारला जातो)—

'कसं बै सुचतं तुम्हाला एवढं? ग्रेटच की अगदी.' यावर, अर्थातच 'कसचं, कसचं...' नंतर, 'तुम्ही इथे येऊन...' इ. इ. कॅमेऱ्यांचा क्लिकक्लिकाट, टाळयांचा नाजूक कडकडाट. चला आजचा खेळ खतम!

एखाद्या रोटरी, नाही तर लायन्स क्लब जेसीजच्या अशाच नेहमी मीटिंग्ज होत असतात. कधी ताज, तर कधी ओबेरॉय, नाही तर कधी प्रेसिडेंटमध्ये. डामडौल, आलिशान बिझनेसच्या गप्पा, जगप्रसिद्ध शेफनं बनवलेल्या चविष्ट डिशेस. नंतर चित्र पूर्ण व्हावं म्हणून कधी भूतदया, तर कधी 'कल्चरल' इत्यादी कार्यक्रम. ◻

# ◻ साहित्यिक, सरकार आणि पारितोषिके

असा डामडौल नसतानाही कार्यक्रम जवळीक साधून गेला तो नायगावच्या साध्यासुध्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातला मागच्या स्नेहभेटीचा. मोजक्याच माणसाच्या उपस्थितीमुळं कार्यक्रम खराखुरा कौटुंबिक वाटत होता. सध्या बऱ्याच वादळी चर्चा आणि घटनाना खाद्य पुरवणाऱ्या विषयावर या कार्यक्रमात मुक्त चर्चा होती. 'साहित्यिक, कलावंत आणि पारितोषिके' हा चर्चेचा विषय. तसं पाहिलं तर आतापर्यंत या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. अधिक चर्चेमधून तपशिलाचे फरक सोडले तर काही नवीन मुद्दे बाहेर येतील अशी परिस्थिती राहिलेली नाही. बऱ्याच संपादकांनी या वादावर तर आता पडदेही टाकले आहेत. तरी पण या चर्चा महत्त्वाच्या आहेत. शिफारस समितीनं शिफारस केलेल्या तीन पुस्तकांना पारितोषिकं देण्याचं सरकारनं नाकारलं त्याविषयी मी म्हणते आहे. या घटनेला निरनिराळे पैलू आहेत. या पारितोपिकांचं प्रयोजन काय? ती सरकारला ठेवण्याचा अधिकार अथवा गरज आहे काय? साहित्यिकांना ती स्वीकारण्याचा अधिकार अथवा गरज आहे काय? शिफारस समितीचं नक्की स्थान काय? पारितोषिकं सरकारी आहेत म्हणजे नेमकं काय? त्या पारितोषकांबरोबर काही बांधिलकी येते

का ? यावीं का ? या बांधिलकीचं स्वरूप कशा प्रकारचं असतं ? सामाजिक, राजकीय की पक्षीय ? हे सारे मुद्दे एका शेजारी एक मांडून त्यांचा समग्रपणे विचार करायला हवा आणि सर्वांत महत्त्वाचं हे की, हे सारं समाजातल्या जमेल तितक्या व्यक्तींपर्यंत पोचवायला हवं. कारण अशा घटनांचे विचार करून आणि त्यावर आपली मतं घडवूनच समाजाची बौद्धिक जाणीव वाढत असते.

चर्चेमध्ये प्रारंभी अर्थातच एक अधिक मान्यता असलेलं सार्वत्रिक मत मांडलं गेलं की, सरकारला अशा रीतीनं पारितोषिक नाकारण्याचा काहीही हक्क नाही. कलावंताचं स्वातंत्र्य अबाधित असायला हवं. कला आणि कलाकाराचं महत्त्व आणि ते न जाणणाऱ्या असंस्कृत, संकुचित वृत्तीच्या सरकारचा निषेध, अशा सुरात चर्चेला आरंभ झाला.

पारितोषिकपात्र म्हणून ठरवले गेलेले मात्र पारितोषिकप्राप्त नसलेले श्री. आ. ना. पेडणेकर बोलले. त्यांचे विचार अगदी सरळ होते आणि त्यांनी ते सरळपणे मांडले. मुळात पारितोषिक असण्याची आवश्यकताच काय ? तर पारितोषिकांमुळं साहित्यिकाला उत्तेजन मिळतं. त्याचं नाव होतं. बिचाऱ्याला चार पैसेही सुटतात ! दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, प्रकाशकालाही लेखकाबद्दल विश्वास वाटतो. त्यानं आपलं भांडवल गुंतवलेलं असतं आणि एखाद्या लेखकाला/पुस्तकाला पारितोषिक मिळाल्यामुळं प्रकाशकाची प्राप्ती वाढली तर बरंच की—हा व्यवहार्य मुद्दा. मग पेडणेकरांनी पारितोषिक नाकारलं ते कशासाठी ? 'जे सरकार त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञ अशा समितीची शिफारस डावलतं, त्या सरकारवर माझा विश्वास नाही. सरकारला पुस्तक आणि त्यातले विचार पटोत अथवा न पटोत; पण न पटणाऱ्या विचाराचा सामना विचारानंच करायला हवा. अशा प्रकारची दडपादडपी करून नाही. तेव्हा ज्या सरकारनं इतकं रागडं, अशिक्षित वर्तन केलं, त्या सरकारकडून पारितोषिक स्वीकारण्याची माझी इच्छा नाही.'

अभिनव प्रकाशनाच्या श्री. वा. वि. भटांनी बरेच अभिनव विचार मांडले. त्यांच्या भाषणाची सुरुवातच मुळी धक्कादायक होती. 'साहित्यिक आणि शासन यांच्यातला झगडा तर सनातनच आहे. यामध्ये साहित्यिक कला, कलाकाराचं स्वातंत्र्य, कलाविष्कारातून प्रकट होणारं अंतिम सत्य अशा गोष्टींचं समर्थन करतात हे खरं; पण शासनालाही काही बाजू असतेच की. तेव्हा शासनानं एखाद्या पुस्तकाला पारितोषिक द्यायचं नाकारलं, तर तो शासकीय निषेध नोंदवण्याचा भागही असू शकेल, की हे पुस्तक मला पसंत नाही. कारण यातल्या संदर्भाला माझी मान्यता नाही. खेरीज, शिफारस समिती निःपक्षपाती असेल आणि तिनं केलेलं मूल्यमापन अगदी बरोबरच असेल हे तरी कशावरून ? अखेर विचारवंत कुणाला म्हणावं ? कारण कित्येकदा दोन विद्वान आणि विचारवंतसुद्धा एकमेकांच्या अगदी विरुद्ध मुद्दे मांडतात आणि ते सप्रमाण सिद्धही करतात. तेव्हा शिफारस समितीलासुद्धा मर्यादा आहेतच.

'दुःखात सुख याच गोष्टीचं मानायला हवं की शासन एखाद्या लेखकाला पारितोषिक नाकारण्यापलीकडे अजून तरी जात नाही. त्याला कोणी शिक्षा करीत नाही. तुरुंगात डांबत नाही किंवा त्याच्या पुस्तकावर कुणी बंदी आणत नाही. असं असताना लेखकांनी एवढा हल्लागुल्ला करण्याचं कारण काय ? नाही तरी पारितोषिकाना असं अवास्तव महत्त्व देणं मूर्खपणाचच आहे. अखेरीस कलानिर्मिती होते, ती काय दान-दक्षिणेच्या अपेक्षेने थोडीच ? यातून चार पैसे सुटावे, पारितोषिक मिळावं म्हणून तर निश्चितच कोणी लिहीत नाही. लेखकाला काही सांगायचं असतं म्हणून तो लिहितो. त्याच्यातला जितेजागतेपणा त्याला लिहायला लावतो. या लेखनप्रपंचात आनुषंगिक महत्त्वाची ठरतात ती पारितोषिक नाहीत, तर लेखनाचं स्वातंत्र्य. ते स्वातंत्र्य टिकवण्याची धडपड करायला हवी. ते स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या सर्व शक्तींशी लेखकाचा लढा असायला हवा. तेव्हा झगडा आहे तो एखादं अंतुले शासन, इंदिरा गाधी सरकार, किंवा एखाद्या वसंत साठ्यांविरुद्ध नव्हे; भांडण आहे ते दडपशाहीविरुद्ध. लेखकावर बंधन आणण्याचा अधिकार फक्त लेखकांना आहे.'

. या घणाघाती आवेगानंतर बोलले 'सत्यकथे'चे श्री. पु. भागवत. संयत, रेखीव, बोलकं आणि व्यासंगातून आलेले चौफेर तपशील. त्यांच्या भाषणातले काही मुद्दे अगदी नेमक्या महत्त्वाचे होते. 'पारितोषिक सरकार देतं म्हणजे तरी काय ? शेवटी सरकारही आपण निवडून दिलेलं. त्याला पारितोषिक देण्याचे अधिकार आणि सरकारी खजिन्यातला पैसा हे सारं आपणच दिलेलं. तेव्हा सरकारनं दिलेली पारितोषिकं म्हणजेसुध्दा आपणच दिलेली. ती रसिक वाचकांच्या पसंतीची पावती आहे. तेव्हा पारितोषिकं का म्हणून नाकारावी ? हा मुद्दा खरंच महत्त्वाचा आहे. त्या मानानं तो प्रकाशात का आला नाही हेच कळत नाही. पारितोषिक नाकारणारे आणखी एक विद्वान म्हणालेही होते की, सरकारी पारितोषिक नाकारायचं, तर सरकारी दूध, वीज, पाणी, वाहतूकसेवा असं सारचं नाकारावं लागेल. ते शक्य नाही हे एक, आणि काय म्हणून आपण आपले हे हक्क सोडावेत ? पण साहित्याबद्दल सिंहासनाची आणि खादीवाल्या कोट-टोपीची अनभिज्ञता हा खरा दुःखाचा मुद्दा आहे. सरकारमध्ये कोणी वाचत नाही. आणि सरकारी उत्तेजन म्हणजे संस्थानिकी आश्रयाचाच प्रकार आहे. स्वस्त दरानं कागद


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

**मूल्य : रुपये पंधरा**

उपलब्ध करून दिला तर 'साहित्य संस्कृती मंडळाचे फार उपकार झाले हो' अशी पाटी पुस्तकाच्या कपाळावरच लावावी लागते.' बोलण्याच्या ओघात भागवतांनी पंडित नेहरूसंबंधी दोन गोष्टी सांगितल्या. 'डी. जी. तेंडुलकर, गांधी आणि नेहरूंच्या पत्रव्यवहाराचं संकलन करत होते तेव्हा एकमेकांबरोबर वाद घालणारी, मतभेद असणारी अशी त्या परस्परांमधील काही पत्रं त्यांना मिळाली. मात्र त्या पत्रांचा संग्राहक ती छापण्याची परवानगी त्यांना देईना. तेव्हा तेंडुलकरांनी त्या पत्रांच्या झेरॉक्स कॉपीज काढून नेहरूंना पाठवल्या. आठवड्याच्या आत नेहरूंचं उत्तर आलं, ही पत्रं का छापू नयेत हे काही मला कळत नाही. मात्र त्यामध्ये काही टार्यपिंगच्या चुका होत्या, त्या मी दुरुस्त केल्या आहेत, तेवढ्या ध्यानात घ्या ! आणखी एका प्रसंगी, जगप्रसिध्द इतिहासकार आर्नोल्ड टॉयन्लींचं व्याख्यान विद्यापीठात व्हायचं होतं. अध्यक्ष होते नेहरू. वाहतुकीत अडकल्यामुळे टॉयन्लींना यायला उशीर होऊ लागला. तेव्हा अस्वस्थ झालेले नेहरू त्यांना शोधण्यासाठी स्वत: जातीनं बाहेर पडले ! विद्या आणि कलागुणांची कदर करणाऱ्या सुसंस्कृत शासकाचा हा खानदानी अभिजात नमुना आहे. अशी अपेक्षा हल्ली करावी कुणाकडून, याविषयी न बोललेलचं बरं ! ¤

## □ मस्जिदला बारा इमारतींचा जोहार

शनिवारच्या संध्याकाळी तमाम मुंबईकर टी. व्ही. वरच्या 'कन्यादाना'त रंगून गेले होते, त्याच सुमाराला मस्जिद भागातल्या बारा इमारती धडाधडा पेटून उठल्या. गळ्यात गळे आणि पायात पाय अडकवून असणाऱ्या या सख्या गेली कित्येक वर्षं एकमेकींची साथ निभवत असतील, आज जोहार केल्यासारख्या एकत्रच त्या मृत्युमुखीही पडल्या ! मस्जिद म्हणजे मुंबईची गजबजती बाजारपेठ. इथे मिळत नाही अशी वस्तू बहुधा शोधूनही सापडणार नाही. इथल्या इमारतींच्या कळकटलेल्या आणि वर्षानुवर्षं तेल-पाणी, रंगरंगोटी न मिळालेल्या रूपावर जाऊ नका. इथल्या छोट्याछोट्या बिळातल्या कुठल्याही एकाचं दार तुम्ही उघडलंत, तर आतल्या निराळ्याच विश्वानं चकित होऊन जाल. आत उंची वॉलपेपर्स, किमती फर्निचर आणि एअरकंडिशनिंगचा सुखद थंडावा असेल. सकाळी दहा-अकराच्या सुमाराला कल्याण-उल्हासनगरमधून लगबगीनं इथली ऑफिसं गाठणारे गुनीमजी, कारकून दिसतील. संध्याकाळी कामं संपवून घाटकोपर, मुलुंडच्या आपल्या घरी परतणारे शेट– भाटिये दिसतील. एकदा तेही गेले की, मग राज्य उंदीर-घुशींचं. वर्षानुवर्षं चाललेल्या धान्यव्यापारातून गळणाऱ्या, कुजणाऱ्या आणि रुजणाऱ्या अन्नब्रह्मानं त्यांना पोसलं आहे. या साऱ्या इमारती त्यांनी आधीच पोखरून खिळखिळ्या केल्या आहेत. वाहतुकीत असलेल्या रसायनांच्या बेकायदा साठ्याचं निमित्त झालं आणि बघताबघता या इमारती जळून खाक झाल्या !

मस्जिद अजूनही तसंच गजबजलेलं आहे. सर्वस्व जळून गेल्यामुळं आकांत करणाऱ्या त्या कादरमियाला जर तुम्ही बघत राहिलात, तर अर्ध्या मिनिटातच तुमच्याभोवती हातगाड्या, बैलगाड्या, ट्रक, सायकलींचं असं काही कडं होईल की, तुम्हाला त्यातून बाहेर पडणं मुष्किल होईल. मात्र समोरच्या गजबजत्या चित्रात आकाशाचा ओकाबोका तुकडा भसकन् नजरेत भरतो. दाटीवाटीनं उभ्या राहिलेल्या छपरांनी बाकीच्या ठिकाणी या आकाशाला कधीच हद्दपार केलं आहे. मशिदींचे उंच मिनार त्या वैराण आकाशात भकास वाटतात. त्यांच्यामागे जो काळवंडलेपणा आहे, तो काळ्या ढगांचा की अजूनही धुमसत्या इमारतींचा ? कोण जाणे !

— ललिता बर्वे


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# फ्रान्स

## समाजवाद्यांच्या देशाचा अर्थ

वा. दा. रानडे

फ्रान्समध्ये तेवीस वर्षांनंतर समाजवाद्यांचे नेतृत्वाखाली डाव्याचे सरकार अधिकारावर आले आहे. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मितेराँ निवडून आले त्याच वेळी फ्रेंच लोकमत निर्णायकपणे डावीकडे झुकले असल्याचे स्पष्ट झाले होते. द गोलवादी आणि जिस्कावादी या दोन उजव्या पक्षाचे पराभवाइतकाच या निवडणुकीतील दुसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे कम्युनिस्टांचा पराभव. त्यांच्या जागा ८६ वरून ४४ वर आल्या म्हणजे जवळजवळ निम्म्याने घटल्या. त्यांच्या मतामध्येही पंचवीस टक्के घट झाली. नॅशनल असेंब्लीच्या एकूण ४९१ जागापैकी २८५ जागा समाजवाद्याना मिळाल्या आहेत. आपला कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी कम्युनिस्टाच्या पाठिंब्यावर अवलंबून असण्याची आता त्याना आवश्यकता नाही तरी मितेराँ यांनी नव्या मंत्रिमंडळात चार कम्युनिस्टांचा समावेश केला आहे. अमेरिकेत त्याबद्दल प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

कम्युनिस्टाना मंत्रिमंडळात घेतल्याने संरक्षण व परराष्ट्र धोरणासंबंधीची महत्त्वाची गुपिते रशियाला आधी कळतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली; पण मितेराँ यांना हे समजत नाही असे कसे म्हणता येईल?' मितेराँ यानी कम्युनिस्टाना मंत्रिमंडळांत घेतले असले तरी महत्त्वाच्या खात्यापासून दूर ठेवले आहे. वाहतूक, कारभार सुधारणा, आरोग्य व व्यावसायिक शिक्षण यासारखी दुय्यम खातीच त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत आणि महत्त्वाच्या प्रश्नांवरचे निर्णय सबंध मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले जात नाहीत. संबंधित खात्याच्या मंत्र्यांशी चर्चा करून अध्यक्ष निर्णय घेतात व ते जाहीर करण्यापूर्वी मंत्रिमंडळाचे बैठकीपुढे ठेवले जातात अशी फ्रान्समधील प्रथा आहे. तेव्हा महत्त्वाची गुपिते कम्युनिस्ट मंत्र्यांना आधी कळण्याची शक्यता नाही. त्यासंबंधीची भीती निराधार आहे. कम्युनिस्टांना सरकारमध्ये घेतल्याने समाजवाद्यांना आपल्या कार्यक्रमात कोणताही बदल करावा लागणार नाही. तो प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य कम्युनिस्ट पक्षात राहिलेलेच नाही. उलट सरकारमध्ये घेतल्याने कम्युनिस्ट अधिक सौम्य धोरण स्वीकारतील असे मितेराँ याना वाटते. कम्युनिस्टाच्या नेतृत्वाखालील कामगारसघटनाच्या कामगाराची मते मितेरांना मिळाली. त्याच्या विजयात या मताचा मोठा वाटा होता. कम्युनिस्टाना मंत्रिमंडळात घेऊन या कामगाराचे समाधान व विश्वास मितेराँ यानी मिळविला आहे.

तसेच मंत्रिमंडळात प्रवेशासाठी फ्रेंच कम्युनिस्टाना आपल्या धोरणातही काही महत्त्वाचे बदल करावे लागले. अफगाणिस्तानातून रशियाने फौजा काढून घेतल्या पाहिजेत या समाजवाद्यांच्या भूमिकेस पाठिंबा देण्याचे त्यांनी मान्य केले आहे. फ्रान्सने नाटोकरारात राहण्याच्या भूमिकेसही त्यांनी पाठिंबा दिला आहे. पोलंडबाबतही कम्युनिस्टाना भूमिका बदलावी लागली. 'देशाची आर्थिक, सामाजिक व लोकशाहीच्या दृष्टीने पुनर्घटना करण्याचे कार्य तेथील लोकानीच पुरे केले पाहिजे' अशी अपेक्षा दोन्ही पक्षानी एका निवेदनात व्यक्त केली आहे. त्यात रशियन हस्तक्षेपाला विरोध व सोलिडॅरिटी या पोलंडमधील स्वतंत्र कामगार संघटनेच्या भूमिकेस पाठिंबा सूचित होतो. या साऱ्या गोष्टी लक्षात घेता मंत्रिमंडळात प्रवेश करताना कम्युनिस्टानाच आपल्या धोरणात बदल करावा लागला आहे हे उघड दिसते.

फ्रान्समध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर काही काळ 'पॉप्युलर फ्रंट' या डाव्याच्या आघाडीचे सरकार अल्प काळ अधिकारावर होते. त्या वेळच्या चुका टाळून आता फ्रान्सला स्थिर समाजवादी राजवट द्यावयाची व समाजवादी कार्यक्रम निर्धाराने अंमलात आणावयाचा असा मितेराँ याचा प्रयत्न राहणार आहे.

परराष्ट्र – धोरणात अफगाणिस्तानातून रशियन फौजा काढून घेतल्या पाहिजेत ही शिखरपरिषदेसाठी पूर्व अट मितेराँ घालतील. दक्षिण अमेरिकेतील हुकुमशाही राजवटीना अमेरिका मदत करते त्याचा निषेध करणे, हुकुमशाही राजवटीना कोणतीही शस्त्र-मदत करावयाची नाही आणि टप्प्याटप्प्याने पण दोन्ही बाजूनी एकाच वेळी शस्त्रकपात करावी या भूमिकेचा नवे फ्रेंच सरकार पुरस्कार करील.

विकसनशील देशांना विकसित देशानी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.७ टक्के प्रमाणात विकासासाठी मदत दिली पाहिजे व या पायावर नवी जागतिक आर्थिक व्यवस्था उभारली पाहिजे असा आग्रह नवे सरकार धरील.

आर्थिक धोरणाच्या बाबतीत येत्या वर्षात आर्थिक विकासाचा वेग किमान तीन टक्के ठेवणे हे समाजवादी सरकारचे उद्दिष्ट आहे. अकरा औद्योगिक गटांचे व बँकाचे राष्ट्रीयीकरण सरकार करणार आहे. सार्वजनिक उद्योगांचे क्षेत्रात २ लाख १० हजार नवे रोजगार निर्माण करण्याचा सरकारचा कार्यक्रम असून त्याचा पहिला टप्पा म्हणून या वर्षात ५५ हजार रोजगार निर्माण करण्यात यावयाचे आहेत. त्यासाठी अधिक उत्पन्नाच्या गटांवर आणि बँकाच्या नफ्यावर तात्पुरता सुपरटॅक्स बसविण्यात येणार आहे. किमान पगारात दहा टक्के वाढ सरकारने जाहीर केलीच आहे. मासिक कुटुंबभत्त्यात २५ टक्के वाढ जुलैपासून अंमलात येत आहे. घरभाडेभत्त्यात ५ जुलैपासून २५ टक्के व डिसेंबरपासून आणखी २५ टक्के अशी ५० टक्के वाढ करण्यात येत आहे. निवृत्त अपंग प्रौढाच्या किमान निवृत्तिभत्त्यात २० टक्के वाढ करण्यात आली आहे.

सध्याच्या घटनेत व निवडणूकपद्धतीत काही बदल करण्याचा मितेराँ याचा विचार आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीस ते अनुकूल आहेत. अध्यक्षांचे अधिकार मर्यादित करून नॅशनल असेंब्लीचे अधिकार वाढविले पाहिजेत, तिला अधिक स्वायत्तता दिली पाहिजे, अशी त्याची भूमिका आहे. अध्यक्षाना सध्या स्वत:च्या अधिकारात अनेक बाबतीत निर्णय घेता येतात त्यावर नॅशनल असेंब्लीचे नियंत्रण असले पाहिजे असे मितेराँ यांना वाटते. विरोधी पक्षांनाही बिल माडण्याचा अधिकार दिला पाहिजे असे त्याचे मत असून त्या स्वरूपाची दुरुस्ती घटनेत करण्यात येईल. न्याययंत्रणेचे स्वातंत्र्य राख-

ण्यासाठीही सध्याच्या घटनेत काही बदल करण्यात येतील. ' हाय कौन्सिल ऑफ मॅजिस्ट्रेचर ' हे फ्रासमधील सर्वोच्च न्यायालय सध्या घटनेप्रमाणे अध्यक्षाना जबाबदार असते. अध्यक्षांचेही त्याच्यावर काही नियंत्रण असू नये अशी दुरुस्ती करण्याचा मितेरॉं यांचा विचार आहे. घटनेप्रमाणे अध्यक्षपदाची मुदत सध्या सात वर्षे आहे. ही मुदत कायम ठेवण्याची असेल तर एकदा निवडून आलेल्या व्यक्तीस दुसऱ्यांदा अध्यक्षपदासाठी उभे राहता येणार नाही किंवा अध्यक्षपदाची मुदत पाच वर्षे ठेवून दोन वेळापेक्षा अधिक वेळा कोणालाही अध्यक्षपदावर राहता येणार नाही अशी दुरुस्ती ते करणार आहेत.

समाजवादी सरकार सर्वांत अधिक प्राधान्य विकेन्द्रीकरणास देणार आहे. स्थानिक संस्थांना अधिक अधिकार देण्यात येतील. त्यांची निवडणूकही प्रमाणशील प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने होईल (प्रमाणशीर प्रतिनिधित्व म्हणजे राजकीय पक्षांना मताच्या प्रमाणात जागा ) आपल्याकडे म्युनिसिपल कमिशनरांना बरेच अधिकार असतात, तसे फ्रान्समधील प्रिफेक्टना असतात. स्थानिक संस्थाचे निर्णय बाजूस सारण्याचे अधिकार त्याना आहेत. त्याचा हा अधिकार काढून घेणारे बिल सरकार आणील असे आश्वासन मितेरॉं यानी दिलेले आहे.

फ्रान्सच्या सध्याच्या घटनेत अध्यक्षांच्या हाती बरीच सत्ता केन्द्रित झालेली आहे, या तरतुदीचा फायदा घेऊन एखादी महत्त्वाकांक्षी व्यक्ती हुकूमशहा बनण्याचा धोका असतो. हा धोका मितेरॉं याना कायमचा टाळावयाचा आहे त्यासाठीच अध्यक्षाचे अधिकार मर्यादित करून नॅशनल असेंब्लीचे अधिकार ते वाढविणार आहेत.

फ्रेंच जनतेने मोठ्या बहुमताने मितेरॉं यांच्या समाजवादी पक्षास निवडून दिले असल्याने हा कार्यक्रम अंमलात आणण्यात कोणतीही अडचण नाही. तो अंमलात आला तर फ्रान्सचा तोडवळा बदलून जाईल. मितेरॉं यांना यात यश आले तर युरोपातील इतर देशांवरही त्याचा परिणाम होऊन तेथेही समाजवादी शक्तीचे बळ वाढेल. □

## उत्तरमीमांसा : १२ :

स. शि. भावे

# सर्वंकष प्रदूषणाचे बळी

दिनकर भिडे.

२८ वर्षांचा तरुण इंजिनियर. कर्तृत्वाची स्वप्ने पाहणारा. आई–वडील–पत्नी–पोटात दिनूचे होणारे बाळ. साऱ्यांची आशा, साऱ्यांचा आधार असा दिनू.

असा दिनू एकाएकी अस्वस्थ होतो आणि दोन तासांत या जगाचा कायमचा निरोप घेतो!

मरणकाळचा तपशील कसला आठवायचा ? तरी तो आठवत राहतो.

दुपारी बारा वाजता दिनू कारखान्यातून घरी येतो. 'लवकर वाढ. लगेचच जायचंय!' असे पत्नीला सागतो.

पण तो घामाने डबडबलेला आहे, खूप थकलेला आहे, ताणलेला आहे, हे पत्नीला दिसते. 'आज दुपारी गेलं नाही तर नाही का चालणार ? थोडं पडावं. विश्रांती घ्यावी.' तिची काळजी बोलकी होते.

'नाही ग. आज तर फारच अर्जंट काम आहे!' तो त्या कामात, कामाच्या नादात बुडालेला असतो. जेवण सवयीने पुरे होते. स्कूटर दोन मिनिटात पूर्ण वेगाने कारखान्याच्या दिशेने धावू लागलेली असते.

काम व्यवस्थित चाललेले असते. एका टप्प्याचे मार्गदर्शन पुरे झाले असल्याने तो दोन क्षण आरामात मागे टेकतो आणि क्षणार्धात ताडकन उठून बसतो. फार अस्वस्थ वाटू लागलेले असते.

बॉसच्या टेबलापुढे जाऊन म्हणतो, 'मला घरी सोडता का ? आत्ताच्या आत्ता!'

बॉस सावध होतात, 'इथेच पडतोस का? मी घरी फोन करतो.'

'नको नको, मला ताबडतोब घरी सोडा तुमच्या गाडीतून सोडा. प्लीज! मला स्कूटर चालवता येणार नाही!'

बॉस उठतात. दिनूला अलगद घरी सोडतात.

घरी वडील एकटे. आई-पत्नी खरेदीला बाहेर गेलेल्या. वडील स्वतः डॉक्टर. स्वतः हार्ट पेशंट.

ते घाबरले; पण उपाय करायला पाहिजेत. त्यानी दिनूला कॉटवर झोपवला. सारे कपडे सैल केले. मग त्याच्या ध्यानात आले. हव्या त्या गोळ्या, इंजेक्शने घरात नाहीत. ऐन उन्हाचे, चालवत नसताना, ते बाहेर पडले.

अर्ध्या तासाने सारी औषधे घेऊन परत आले.

दिनू कॉटच्या खाली, सतरंजीवर, एका तक्क्यावर डोके ठेवून कुशीवर अर्धा पालथा होऊन शात झोपला होता. वडिलांनी त्याला इंजेक्शन दिले आणि मग सरळ झोपावा म्हणून उताणे केले तर दिनू शात! सगळ्याच्या पलीकडे गेलेला!

¤

मला फार समजून घ्यावेसे वाटते आहे.

कॉटवरून अस्वस्थ होऊन जेव्हा दिनू खाली उतरून सतरजीवर पडला असेल तेव्हा त्याच्या मनात काय काय आले असेल ?

'आपण इतके सशक्त, तगडे आपल्याला हे का व्हावे ? याआधी असले काहीच कसे जाणवले नाही ? आपण आपल्या स्वतःकडे शातपणाने कधी बघितलेच कसे नाही ? आपल्या जवळच्या माणसांनाही हे जाणवले कसे नाही ? पण असं कसं ? जाणवले होते. दुपारी कारखान्यात जाऊ नका, विश्राती घ्या–असं पत्नीनं सागितलं होतं. आधीही कधीकधी ऐकवलं होतं; पण आपण ऐकलं नाही. का नाही ऐकलं आपण ?'

असे काही तरी प्रश्न दिनूच्या मनात त्या मोजक्या क्षणात नक्कीच येऊन गेले असतील! आणखीही प्रश्न असतील. 'आत्ता, इथेच संपायचं आहे हे आधी कळलं असतं तर इतकी जिवाची तकतक केली नसती. नंतर करू, नंतर करू म्हणून अनेक गोष्टी टाळल्या; पुढे ढकलल्या. तसं करायला नको होतं. म्हणजे आत्ता या शेवटच्या क्षणी, बऱ्याच गोष्टी त्या त्या वेळी केल्या असं समाधान झालं असतं. आत्ता हातात काहीच नाही; मनात आहे रुखरुख. हे राहिलं, ते राहिलं याची.

अशी रुखरुख मनात ठेवून हा २८ वर्षांचा तरुण इतक्या तडकाफडकी का गेला ? यातली अपरिहार्यता कोणती ?

¤

बा. भ. पाटील.

पत्रकार. स्तंभलेखक. ग्रामीण, विनोदी किस्से चविष्ट शैलीत रंगविणारा. माडगूळकर-मिरासदार-शंकर पाटील यांचे बोट धरून शैली कमावणारा; परंतु आपल्या शैलीत आपले स्वतःचे वेगळे काही तरी असावे असा विचार अलीकडे अलीकडे करू लागलेला. हसतमुख. एक डोळा बारीक करून, कसल्या कसल्या तपशिलांनी गप्पा रंगवणारा. फर्गसनच्या 'साहित्य सहकार' मध्ये वीसएक वर्षांपूर्वी भेटलेला आणि नंतर मैत्रीचे संबंध कायम ठेवलेला.

हा माणूस ऐन चाळिशीत असा का जावा ? पत्रकारनगरात स्वतःचे घर करून त्याने यशाचा एक टप्पा गाठला होता. सरकारी बक्षीस, साहित्यसंमेलनात जाहीर कथा-कथन [अशा मार्गाने तो प्रतिष्ठित वर्तुळात मानाने मिरवू लागला होता.

बा. भ. पाटील दिनूप्रमाणे आकस्मिक गेला असे म्हणता येणार नाही; पण त्याचे शरीर ऐन चाळिशीत असे पुरते पोखरले जावे, हे अकालीच म्हणावे लागेल.

शरीर असे चाळिशीत पोखरले जाण्यातील अपरिहार्यता कोणती ?

या दोघानी जास्त काळजी घ्यायला हवी होती, असे आपण म्हणू शकू. लोक साधारणपणे असेच म्हणतात, 'अमुक अमुक नाद होता ना, मग असंच होणार', असे निःशंक निष्कर्ष आपल्यापुढे फेकतात.

अशा निष्कर्षांना आपण विरोध करत नाही. एक तर अशा प्रसंगाचा धक्का एवढा जोरदार असतो की, विश्लेषणाची हौस उरलेली नसते. दुसरे म्हणजे इतके ठाम निष्कर्ष काढणाऱ्याविषयी फारच मोठा आदर वाटतो. त्यामुळे त्याच्याबरोबर वाद घालण्याची हिंमत होत नाही.

पण असे सुबक निष्कर्ष आपल्या मनाला पटलेले नसतात. स्वतःची काळजी न घेणारे काय आणि काळजी घेणारे काय, सर्वांच्या पाठीमागे मरण सध्या हृदयाच्या झटक्याच्या रूपाने जास्त वेळा उभे असते, हे आपण जाणत असतो. कुणाला मेंदूतील रक्तस्रावाने, कुणाला रक्तात अचानक गुठळी तयार झाल्याने, कुणाला हृदयाशी रक्तवाहिनी फुगून चिरकल्यामुळे, कुणाला हृदयाच्या स्नायूला वांब आल्यामुळे, तर कुणाला रक्तपुरवठ्यात अचानक खंड पडल्याने—असे तडकाफडकी मृत्यू आलेले आपण बघत असतो, ऐकत असतो, वाचत असतो.

शास्त्राच्या पद्धतीने विचार करायचा तर असे म्हणावे लागते की, त्या त्या क्षणी जरी हे मृत्यू आकस्मिक झाल्यासारखे दिसत असले तरी त्याची पूर्वतयारी बऱ्याच आधीच्या काळापासून चालू असली पाहिजे. ही पूर्वतयारी किंवा हा ऱ्हास चालू आहे हे आपल्याला कळत नाही इतकेच.

पण हे कळणे अधिकच भयंकर म्हणायला हवे. कारण या ऱ्हासाची चाहूल जर आपल्याला लागली तर आपण काही प्रतिबंधक उपाय करू शकू. आज कसे होते ? दिसायला माणूस तगडा दिसतो. त्याच्या निकोप प्रकृतीची आपण प्रशंसा करीत असतो आणि कोणत्याही एखाद्या दिवशी बातमी येते : 'ते गेले. अवघ्या दोन मिनिटांत.'

पूर्वी जरा अशक्त, आजारपण दिसत असलेल्या व्यक्तीविषयी काळजी वाटायची. हल्ली धडधाकट माणसाबद्दलही काळजी वाटते. या धडधाकट दिसणाऱ्या शरीराच्या आतून पोखरण तर चालली नसेल ना, अशी काळजी वाटते. चांगल्या प्रकृतीच्या माणसांबद्दल असा विचूक विचार आपल्या मनात यावा यासाठी संकोच वाटतो; पण अशी विचूक काळजी वाटायची ती वाटतेच.

यामुळे बऱ्या-वाईट प्रकृतीच्या चर्चेत किंवा चौकशीत हल्ली मी उत्साहाने भाग घेत नाही.

¤

जवळचे माणूस प्रवासाला निघावे किंवा दप्तर घेऊन मूल शाळेला निघावे—म्हणजे परत येईपर्यंत जशी हुरणकाळजी लागते, तशी ही काळजी नसते. वाट पाहण्याच्या त्या काळजीला थोडा तरी बाहेरच्या ज्ञानाचा आधार असतो.

मूल रस्त्याच्या कडेकडने चालत गेले तर त्याला कमी धोका असतो, हे आपल्याला माहीत असते आणि मूल आपलेच, आपण शिकविलेले असल्याने, कडेकडेनेच चालत जाणार अशी आपली खात्री असते. ही खात्री जाणवली की, आपण जरा थोडे निवांत होतो, होऊ शकतो.

किंवा स्कूटरच्या पिलियनवर बसलेल्या आईने जेव्हा मूल एका हाताने धरलेले असते, तेव्हा बघणाऱ्याला जरी अशी भीती वाटत असली की, खड्ड्यातल्या एका गचक्याबरोबर ते बाळ फेकले जाईल—तरी आपण आपल्या बाळाला पक्के धरले आहे या जाणिवेने स्वतः आई बरीचशी निर्धास्त असते.

वाट पाहण्याची काळजी किंवा सुखरूप सांभाळण्याची काळजी—यात शक्यता माहीत असतात, अंदाज करता येतात, काही सावधगिरी बाळगता येते.

पण अचानक आघातानी हे चेचले जाणे, तुटून पडणे याबाबतीत काही अंदाज बांधता येत नाही, काही सावधगिरी ठरवता येत नाही. अदृश्यपणे आपणांवर आणि आपल्या इष्टमित्रावर कोणी तरी पाळत ठेवून आहे आणि कोणत्याही क्षणी त्याचा घाव बसणार आहे अशी असहाय्यता आज वाढत चालली आहे. निरोगी दिसणाऱ्या शरीरांची आतरिक ऱ्हासामुळे होणारी अगतिकता वाढत चालली आहे.

¤

मला वाटते, सध्याच्या सर्वंकष प्रदूषणामुळे हा आंतरिक, गुप्त ऱ्हास एवढा वाढला आहे. थोडे थांबून या प्रदूषणाचा विचार करायलाच हवा आहे. नाही तर ही प्रदूषणे वाढता वाढता एक दिवस असा येईल की, त्या दिवशी हा विचार करण्याइतकेही त्राण मानवाच्या अंगात शिल्लक राहिलेले नसेल. प्रदूषणाने त्याला संपूर्णपणे गिळून टाकले असेल

पहिले गतिप्रदूषण :

आपल्या वाहनांची गती प्रतिदिनी वाढते आहे. पृथ्वीची स्वतःभोवती फिरण्याची गती मात्र तेवढीच राहिली आहे. काही जण म्हणतात त्याप्रमाणे ती अगदी सूक्ष्मपणे कमीही होत असेल. पृथ्वीची गती तीच आणि तीवरील वाहनांची गती मात्र सतत वाढती. हा तोल किती वर्षे सांभाळला जाईल ? जमिनीवरचाच नव्हे तर हवेतील व जलातील वाहनांचा वेगही वाढताच आहे. स्वनातीत यानांमुळे पृथ्वीभोवतालच्या महत्त्वाच्या वलयांना धोका पोचेल असा इशारा आजच शास्त्रज्ञ देत आहेत. वेगाचा हा ध्यास

आपण किती मर्यादेपर्यंत अनियंत्रित ठेवणार आहोत ?

वाहनाच्या गतीमुळे आणि इतर अनेक संमिश्र घटकांनी आज जगण्याचा वेग किती पटीनी वाढला आहे ! आपल्या शरीराला, मेंदूला हा वेग सोसतो का ? हा वेग सोसत नाही, या वेगाला सामावून घेता घेता तर ताकद अपुरी पडत जाते असे दिसते आहे. शरीर हे एक स्वयंसंतुलित यंत्र आहे. त्याच्या स्वयंसंतुलनाच्या काही अटी आहेत. सध्याचा दिनक्रम इतका धावता, वेगाचा झाला आहे की, स्वयं-संतुलनाच्या अटी कोठच्या कोठे भिरकावल्या जात आहेत. हे यंत्र या वेगाने तापते; पण ते थंड होण्यासाठी आवश्यक तो निवात वेळ व तसे वातावरण आपण त्याला देत नाही. मोटारीला देतो; पण शरीराला देत नाही. कारण ते परवडत नाही. बा. भ. पाटलांना हा निवातपणा कधीच परवडला नाही.

दुसरे प्रदूषण ध्वनीचे :

याविषयी तर शास्त्रज्ञानी सध्या बरेच लिहिण्याचा सपाटा चालविला आहे. प्रचंड, भिन्नभिन्न आवाजाच्या गर्द जंगलातून सध्या आपल्याला वाट काढावी लागते. विमानांचे, मोटारीचे आवाज. इंजिनांचे आवाज. कर्ण्यांचे आवाज. ब्रेकांचे आवाज. कोलाहलांचे आवाज आणि संगीताच्या नावाने नाना यंत्रातून बाहेर फेकले जाणारे कसले कसले आवाज. या आवाजांचा घुमाव आणि पल्ला प्रक्षेपक यंत्रानी मानवी कानांच्या श्रवणकक्षेपलीकडे वाढविलेला. काय बिशाद आहे कान फुटणार नाही ! त्यामुळे हल्ली कोणी मृदू, मधूर, मंजूळ आवाजात बोलले तर एक तर ते ऐकू येत नाही किंवा त्यानेच कानठळ्या बसतात. मेंदू मग आपले आतले कान मिटून घेतो, तेवढ्यापुरता बधिर होतो; पण या ध्वनीच्या आघातांनी बाकी मज्जा खिळखिळ्या होतात. त्यांना पुन्हा कधी ताजेपणा, कोवळेपणा प्राप्त होत नाही. त्यांची भ्रूणहत्या होते.

तिसरे क्षितिजसंकोचाचे प्रदूषण. २१ जूनच्या 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये शरच्चन्द्र बेडेकरांनी चांगला लेख याविषयीच लिहिला आहे. तो अवश्य वाचण्यासारखा आहे. दोन डोंगरांच्या मधून सूर्य उगवतो असे चित्र आपण सर्वांनी लहानपणी काढले आहे. आता ते वेगळे काढावे लागेल. आता उंच उंच दोन टाक्यामधून सूर्य उगवतो. तोही सकाळी दहा वाजता !

चौथे प्रदूषण हवेचे. पाचवे प्रदूषण पाण्याचे. म्हणजे पंचमहाभूतांचे पूर्ण प्रदूषण झाले. यात लोकसंख्यावाढीचे सहावे प्रदूषण मिळवले की होते सर्वंकष प्रदूषण. सध्या आपण सारे या सर्वंकष प्रदूषणाचे बळी झालो आहोत. पाटील व दिनकर त्याचेच बळी ठरले आहेत.
¤

या सर्वंकष प्रदूषणाने आपले मन, आपल्या सवयी प्रदूषित होतात हे या प्रदूषणाने होणारे अखेरचे आणि खरेखुरे नुकसान.

घर ते जिमखाना एक मैल. घर ते सिटी-पोस्ट दोन मैल. घर ते स्टेशन तीन मैल. अशी अंतरे असतात. इतके चालले तर काय बिघडेल ? चालत पोचायला वेळ किती लागेल ? सावकाश चालले तरी वीस मिनिटे ते एक तास. आज आपण तेवढा वेळ बस-स्टॉपवर थांबू. बसकंपनीला शिव्या देऊ. टवाळघाकुचाळक्या करू; पण चालणार नाही! वाट बघणे, बसमधेही धक्के खात उभे राहणे– यात पाय दुखवून घेऊ. वेळ तासा-पेक्षाही जास्त जाईल; पण चालणार नाही! अधिकारी मोटरने वरी येतील, पायाची शीर दुखते म्हणत बसतील. पण चालणार नाहीत.

मनाच्या प्रदूषणाचे हे एक उदाहरण झाले. प्रदूषणाने अनैसर्गिक झालेले आपल्या मनाचे असे अनेक भाग आहेत. यथावकाश त्यांचा विचार उत्तरमीमांसेत विस्ताराने करावा असे मनात आहे.

आज मात्र तेवढी सवड नाही आणि मनाची तशी उभारीही नाही. आज मन कोमेजले आहे दिनकर भिडे आणि बा. भ. पाटील यांच्या अकाली निधनाने कातर झाले आहे. या सर्वंकष प्रदूषणाने आपण सारे, किती अगतिक झालो आहो याची जाणीव होऊन उदासवाणे झाले आहे

□


## NEW TITLES RECEIVED

| | | |
|---|---|---|
| 1. | **A Falcon Flies**–(Bestseller Adventure – Wilbur Smith | Rs. 50/– |
| 2. | **Mayday**–(Bestseller Novel on Aviation)– Thomas H. Block | $ 2·95 |
| 3. | **Return from the River Kwai**(War–Non-fiction)– Joan & Clay Blair | £ 1·50 |
| 4. | **The Elephant Man and other Freaks**–Sean Richards | |
| 5. | **Tito–Selected works on the peoples' war of liberation** Josip Broz Tito | |
| 6. | **The Snow Leopard** (Travel/Philosophy)– Peter Matthiessen | Rs. 33·40 |
| 7. | **The Oxford Book of Literary Anecdotes**– Edited by James Sutherland | Rs. 29·55 |
| 8. | **The Petting Zoo** (Picture Story)–Brett Singer | Rs. 24·60 |

* *Hema Malini is ( or was ? ) called a dream girl.*
*At 22, Phoenix too is a dream of a Library ! !*

**THE PHOENIX LIBRARY**
727, Sadashiv, Pune – 411 030

अवतीभवती । शरद कृष्णन्

# □ मुख्यमंत्री अंतुले – वर्ष पहिले !

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेऊन अंतुले यांनी पहिले वर्ष मागे टाकले आहे. मुख्यमंत्री सत्तेवर आले त्या वेळी ज्याच्या पाठिंब्यावर आणि ताकदीवर सत्ता राबवायची त्या विधिमंडळ इंदिरा काँग्रेस पक्षाचा त्यांना एकमुखी पाठिंबा होता असे नाही. ते ज्या वेळी सत्तेवर आले त्याच वेळी वसंतदादा पाटील, प्रेमलाताई चव्हाण आदि मंडळीचे मुख्यमत्रीपदासाठी प्रयत्न चालू होते; परंतु अंतुलेजी यानी दिल्लीत घालवलेली वर्षे कारणी लागली होती. इंदिराजी आणि संजय यांनी त्यांची निवड केली आणि काहीशा अनपेक्षितपणे अतुलेजी मुख्यमंत्री झाले. वर्षभराच्या त्यांच्या कारकीर्दीमध्ये त्यांना अंतर्गत संघर्षाला तोंड द्यावे लागले. प्रबळ असा विरोधी पक्ष नसल्याने विधिमंडळामध्ये कामकाज चालवणे फारसे अवघड नव्हते. अंतर्गत संघर्षाच्या वेळी केंद्रीय नेतृत्वाने सातत्याने त्यांचा पाठपुरावा केल्याने त्याना काम करणे सोपे गेले. ते ज्या वेळी सत्तेवर आले त्या वेळी प्रेमलाबाई चव्हाण यांच्या हाती पक्षाची सूत्रे होती. मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष यांच्यामध्ये सामंजस्य असणे आवश्यक होते. प्रेमलाताईंचे आणि अंतुलेजीचे जमू शकले नाही. तणाव त्रासदायक ठरण्याइतका वाढल्यावर केंद्रीय नेत्यानी अंतुलेजीची बाजू उचलली आणि काकीना पक्षाध्यक्षपद सोडावे लागले. अंतुलेजी सत्तेवर आले तेव्हा सहा महिनेसुद्धा हे मत्रिमंडळ सत्तेवर रहाणार नाही असे भाकित केले गेले; पण आज वर्षभरानंतर पाहिले तर अंतुलेजीचे मंत्रिमडळ केवळ सत्तेवर आहे असे नाही तर त्यांची ताकद वाढलेली दिसते आणि आता तरी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाला फार मोठा धोका असल्याचे दिसत नाही. काही मंत्रीगण अधूनमधून फुरफुरत असतात; पण डोळे वटारले जाताच ही मंडळीही चिडीचूप होऊन जातात. निष्ठावंताचे मेळावे झाले त्या वेळी काही मंत्र्याना पाचारण करण्यात आले होते; पण इच्छा असूनही मुख्यमंत्र्याची आणि केंद्रीय नेतृत्वाची नाराजी नको म्हणून उपस्थित राहण्याची काही त्यांची हिंमत झाली नाही मत्रिमंडळाची जडण-घडण झाली त्या वेळीही अंतुलेजीचे हट्ट मान्य केले गेले. शालिनीताई उपमुख्यमंत्रीपदासाठी हटून बसल्या होत्या; पण नाक मुठीत धरून त्याना मंत्रीपद स्वीकारावे लागले. काही प्रश्नांबाबत त्या आक्रमक भूमिका घेतात. उदाहरणार्थ, यशवंतरावजीच्या काँग्रेस प्रवेशाबाबत मुख्यमंत्र्याचे धोरण नरमाईचे असले तरी चव्हाणांना काँग्रेसप्रवेश देऊ नये यासाठी शालिनीताईंनी जवळजवळ मोहीमच उघडली आहे आणि यशवंतरावाची पुरेपूर मानहानी करण्यात त्यांनी सध्या तरी चांगले यश मिळवले आहे.

आपल्या वर्षभराच्या कारकीर्दीमध्ये मुख्यमंत्र्यांनी अनेक लहान-मोठे स्टंट केले. शिवाजीची तलवार आणण्यासाठी ते लंडनला गेले आणि त्यांच्या या लंडन-भेटीचे भरपूर हसे झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात शरद जोशी याच्या रूपाने एक प्रभावी शक्ती उभी राहिली. शेतकऱ्यांना शेतमालाच्या किमती वाढवून मिळाव्यात म्हणून त्यांनी चळवळ उभी केली. मुख्यमंत्र्याना या गोष्टीची दखल घ्यावीच लागली. महाराष्ट्रामधील जनतेने आपला स्वीकार करावा यासाठी अंतुल्यांनी अनेक लहान-मोठ्या क्लृप्त्या योजल्या. काही प्रमाणात ते यशस्वीही झाले. आज वर्षभरानंतर त्यांचे आसन जास्त सुस्थिर झालेले दिसते. नऊ जून रोजी त्यांनी सत्ताग्रहण केले. आज या गोष्टीला एक वर्ष होऊन गेले. पहिल्या वर्षामध्ये मंत्रिमंडळाने जी कामगिरी बजावली त्याबाबत अंतुलेजी समाधानी दिसतात. 'स्टेट्स्मन' या दैनिकाचे मुबईस्थित विभागीय प्रतिनिधी व मराठीतील सुप्रसिद्ध कादंबरीकार अरुण साधू यांनी अलीकडेच मुख्यमत्र्याची एक मुलाखत घेतली. त्या वेळी आपण जी उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून सत्ताग्रहण केले ती उद्दिष्टे उर्वरित चार वर्षांमध्ये पूर्ण करू शकू असा आत्मविश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

कामाचा प्रचंड उपसा करण्याबाबत अंतुलेजी याची प्रसिद्धी आहे. दिवसाकाठी १८–२० तास करून ते आपली जबाबदारी पार पाडत असतात. त्याची तब्येत त्याना उत्तम साथ देते असे नव्हे. अलीकडील काळात त्यांच्यावर दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या; पण आपल्या तब्येतीचा त्यांनी कधी बागुलबुवा केला नाही. त्याचा स्वभाव काहीसा तापट आणि अनेक विषयावर तिखट प्रतिक्रिया व्यक्त करून वादळ उठवून द्यायची त्याची वृत्ती अलीकडे काहीशी मवाळ झालेली दिसते. न्यायालयाचे स्वातंत्र्य किंवा राष्ट्रपतीची राजवट यासारख्या विषयावरील त्यांच्या जाहीर वक्तव्यावर बरीच उलटसुलट चर्चा झाली; परतु आता या किंवा ज्याच्यावर तिखट प्रतिक्रिया उमटू शकतील अशा विषयावर ते फारसे बोलत नाहीत.

अंतुलेजी यानी आपल्या वर्षभराच्या कारकीर्दीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यापैकी कित्येक निर्णय धाडसी आणि दूरगामी परिणाम करणारे आहेत. वर्षभराच्या कारभारामध्ये ज्यांची विशेष दखल घ्यावी अशी कोणती कामगिरी आपण बजावली आहे ? असा प्रश्न विचारला असता अंतुलेजी म्हणतात : तळा-गाळाच्या माणसांमध्ये, गोरगरिबांमध्ये मी आपलेपणाची भावना निर्माण करू शकलो ही मोठी कामगिरी मानावी लागेल. गोरगरिबांच्या कल्याणासाठी पंतप्रधानानी ज्या योजना आखल्या आहेत त्याची कारवाई करण्यात आम्ही कसूर करणार नाही, असा विश्वास या मंडळीना वाटू लागला आहे. सरकार आपले आहे अशी भावना मी या वर्गामध्ये निर्माण करू शकलो. तसेच त्यांच्या दुःखदायक जीवनाबद्दल आणि त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांबाबत मला खरोखरच चिंता वाटते आणि त्याचे जीवन सुखावह करण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न करतो, असा दिलासा या मंडळीना वाटतो, हे मोठे यश मानावे लागेल.

मलबार हिलच्या उतरणीवर डौलात उभा असलेला बंगला 'वर्षा' हे मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक या बंगल्यात अनेक वर्षे रहात होते. त्यानी बंगल्याच्या परिसरामध्ये अनेक दुर्मिळ झाडे लावली. आता या झाडांमुळेच बंगल्याची शोभा वाढली आहे आणि 'वर्षा' चा परिसर मोठा लोभस झाला आहे. निवासी भागापासून कार्यालयीन भाग

काहीसा अलग आहे. मुख्यमंत्री तसे उशिरा उठतात. कारण अर्थातच कामाचा ताण ! रात्री अनेक वेळा दोन–अडीचपर्यंत काम करत बसत असल्याने त्यांचा दिवस तसा उशीरा सुरू होतो; परंतु ते एकदा कामाच्या चक्रामध्ये अडकले की, रात्री उशिरापर्यंत विसावा नसतो. त्यांची राहणी नीटनेटकी आहे आणि कामाला शिस्त आहे.

आपल्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे प्रश्न कोणते आणि ते सोडवण्यासाठी आपण काय करणार आहात, असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री म्हणतात : नागरी भागामधील–विशेषत: मुंबईमधील-झोपडपट्टयामधील गोरगरिबांसाठी काही चांगल्या योजना आहेत. तसेच लहान शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या दृष्टीने मी प्रयत्न करणार आहे.

झोपडपट्टीच्या प्रश्नाबाबत तपशीलवार बोलताना ते म्हणाले, 'पावसाळा सरताच आमच्या कार्यवाहीला प्रारंभ होईल. माझ्या धोरणांबाबत मी जे बोललो आहे, निवडणूक जाहीरनाम्यातून जी आश्वासने आम्ही दिली आहेत, ती प्रत्यक्षात उतरवली जावीत यासाठी आम्ही शर्थीचे प्रयत्न करू. पंतप्रधानांनी जो वीस कलमी कार्यक्रम दिला आहे त्याच्या अंमलबजावणीमुळे झपाट्याने आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडून येईल असा विश्वास मला वाटतो. संजय गांधी निराधार योजनेद्वारा गरिबातील गरिबापर्यंत पोचण्याचा आमचा प्रयत्न आहे. या योजनेखाली गरजवंताला दरमहा साठ रुपये दिले जातात. अनेक निराधार, अपंग व्यक्तींनी या योजनेचा फायदा घेतला आहे. 'संजय गांधी स्वावलंबन योजना' गोरगरिबाना स्वत:च्या पायावर उभे रहाता यावे या दृष्टीने आखली आहे. या योजनेप्रमाणे गरजवंतांना अडीच हजार रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज देण्यात येते. या योजनेचा लाभ अनेक मंडळींना होत आहे. विशेषत: ज्याची स्वत:च्या पायावर उभे राहण्याची हिंमत आहे परंतु ज्याना भाडवलाचे पाठबळ नाही अशा अनेक मंडळींना भांडवल उपलब्ध करून देणाऱ्या या योजनेचे सहाय्य झाले आहे.

प्रश्न : आपण आता ज्या योजनांचा उल्लेख केलात त्या योजना चांगल्या असल्याचे सांगितले जाते; परंतु या योजनांची कार्यवाही समाधानकारकरीत्या होत नाही अशी तक्रार आपल्याच पक्षामधील मंडळींकडून केली जाते. त्याबाबत आपल्याला काय म्हणावयचे आहे ?

उत्तर : अमलबजावणीबाबत ज्या तक्रारी करण्यात आल्या त्यांची दखल घेणे आवश्यक वाटल्यानेच एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली आहे ही समिती तक्रारींची तर दखल घेईलच; पण त्याचबरोबर या योजनांची सुविहित कार्यवाही व्हावी यासाठीही प्रयत्नशील राहील. या योजनांच्या अंमलबजावणीबाबत जे दोष आहेत त्यांचे मी समर्थन करतो असे नव्हे; परंतु अगदी हुकुमशाही पद्धतीने योजना राबवल्या गेल्या तरीही ज्या यंत्रणेमार्फत योजना राबवल्या जातात त्या यंत्रणेकडून गैरवापर होण्याची शक्यता असते. अंमलबजावणीबाबत दोष मान्य करूनही मी असे म्हणेन की, या योजनेमुळे गोरगरिबांना जो लाभ मिळत आहे तो पाहता या दोषाचा बागुलबुवा करण्यात मला मतलब वाटत नाही.

प्रश्न : कारभार चालवण्याच्या तुमच्या पद्धतीबाबत तुमचे सहकारी नाराज आहेत. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर सहकाऱ्यांचा विचार आपण घत नाही अशी तक्रारही तुमच्या काही सहकाऱ्यांनी केली आहे. याबाबत तुमची प्रतिक्रिया काय ?

उत्तर : माझ्या एकाही सहकाऱ्याने माझ्याकडे आजवर कोणतीही तक्रार केलेली नाही. प्रत्यक्षपणे तर सोडाच पण अप्रत्यक्षपणेही माझ्या कोणत्याही सहकाऱ्याने माझ्या कारभारपद्धतीबद्दल अथवा संबंधित सहकाऱ्यांशी सल्लामसलत न केल्याबद्दल तक्रार केलेली नाही. माझ्या प्रत्येक सहकाऱ्याकडून मला उत्तम सहकार्य मिळत असून मी प्रत्येक सहकाऱ्याचा जास्तीत जास्त कारभाराच्या दृष्टीने चांगला उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

प्रश्न : तुमच्या मुख्यमंत्रीपदाला धोका असून पक्षामध्येच तुमच्याविरुद्ध एक आघाडी उभी राहिली आहे, अशा स्वरूपाच्या बातम्या आहेत. या बातम्यांमध्ये कितपत तथ्य आहे ? तुमच्या मुख्यमंत्रीपदाला धोका आहे असे तुम्हाला वाटते का ?

उत्तर : गेल्या महिन्यात जेव्हा विधिमंडळाचे अधिवेशन संपले त्या वेळी माझ्या पक्षाच्या प्रत्येक आमदाराशी मी बातचीत केली आहे आणि त्यापैकी एकानेही माझ्याबद्दल अथवा मंत्रिमंडळाबद्दल आपण असमाधानी असल्याचे बोलून दाखवले नाही. मग अधिवेशन संपताच एकदम गदारोळ कसा उठतो ? काही हितसंबंधी मंडळी असे प्रयत्न करत असतात इतकेच. अधिवेशन चालू असते तर मी स्वपक्षीय आमदारांची बैठक बोलावून त्यांचा माझ्यावर दांडगा विश्वास आहे हे सहज सिद्ध करून दाखवले असते. याबाबत अधिक स्पष्ट बोलायचे तर माझ्या मुख्यमंत्रीपदाला पक्षांतर्गत स्वरूपाचा कोणताही धोका नाही. याबाबत होत असलेली ओरड ही हितसंबंधी मंडळीकडून होत असलेल्या विषारी प्रचाराचा एक भाग आहे. अशा स्वरूपाच्या प्रचाराकडे एक–दोन महत्त्वकांक्षी मंडळी डोळे लावून बसलेली असतीलही कदाचित; पण मला अशी खात्री आहे की, या ओरडयापाठीमागे आमदारांची शक्ती नाही किंवा या प्रचाराचा जनतेकडूनही पाठपुरावा होत नाही,हे या महत्त्वाकांक्षी मंडळींच्या लक्षात येण्यास वेळ लागणार नाही.

प्रश्न : विरोधी पक्षाबाबत आपले धोरण अवाजवी ताठर असून आपण त्याच्यावर वारंवार टीका करत असता. निरनिराळ्या शासकीय समित्यावर काम करण्याची विरोधी पक्षाची संधी आपण हिरावून घेतली आहे असाही आक्षेप घेतला जातो. आपण एकपक्षीय लोकशाहीचा पुरस्कार करता काय ?

उत्तर : मी एकपक्षीय लोकशाहीचा कट्टर विरोधक आहे. केवळ विरोधासाठी विरोध असेल आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या चळवळीतून केवळ हानी होणार असेल तर ते मी खपवून घेणार नाही. तथापि विधायक स्वरूपाच्या टीकेचे आणि विरोधकाचे मी स्वागत केले आहे.

प्रारंभीच्या काळात अंतुलेजींचे स्थान जेवढे अस्थिर वाटत होते तेवढे ते आता वाटत नाही. वर्षाभरात त्यांनी आपली माड घट्ट बसवली आहे. यशवतराव चव्हाण आणि त्यांच्याबरोबर येणारे अन्य लहान-मोठे नेते याबाबत इंदिरा कॉंग्रेसची भूमिका काहीशी ताठरच राहील आणि यशवंतराव आत येऊन सत्तास्थानी बसले तरी अलीकडेच जनता पक्षाचे खासदार स्वामी यांनी एका मुलखतीमध्ये म्हटल्याप्रमाणे चव्हाण भले मंत्री झाले तरी त्यांना तेज प्राप्त

होणार नाही. अंतुलेजीना जोपर्यंत इंदिराजींचे पाठबळ आहे तोपर्यंत त्यांना कोणीही हात लावू शकणार नाही! आज तरी यशवंतरावांचा पाठपुरावा करणारे अनेक आमदार इंदिरा काँग्रेसच्या दारात बसले असल्याने त्यांचा स्वगृही प्रवेश झाल्यावर आधीच बलशाली असलेल्या इंदिरा काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे सामर्थ्य वाढणार आहे. या वाढत्या सामर्थ्यामागे जशी शक्ती आहे तसेच कच्चे दुवेही आहेत. अंतुलेजी या बदलत्या परिस्थितीचा वापर कसा करून घेतात यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत.

## □ तंबूतला जादूगार–बी. एन. सरकार

सर्कस आणि जादूचे प्रयोग हे दोन्ही प्रकार असे आहेत की, जे एका विशिष्ट अवस्थेपर्यंत झेपावून आता जवळजवळ स्थिरावले आहेत. त्यामुळेच तुम्ही एक मोठी सर्कस पाहिली की सर्कसच्या जगतामधील जवळजवळ सारे काही पाहून होते. सर्कस पाहिली की कमला, ग्रेट रॉयल किंवा ओरिएंटल सर्कस पाहण्याचे प्रयोजन उरत नाही. कारण तुम्ही पाहिलेल्या जैमिनी सर्कसमध्ये जे पाहिलेले असते तेच सारे या उरलेल्या सर्कस दाखवत असतात. जादुगाराचेही काहीसे तसेच आहे. पी. सी. सरकार (ज्यू), के. लाल किंवा रघुवीर याच्या जादूच्या प्रयोगात विलक्षण साम्य आढळते. फरक असला तर तो सजावट, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत, यासारख्या गोष्टींच्या बाबतीत. पुण्यात आलेल्या बहुतेक सर्व मोठ्या जादुगारांचे प्रयोग मी पाहिले आहेत. जादूचे प्रयोग पाहणे ही आता एक कौटुंबिक करमणुकीची बाब झाली आहे. कारण गेल्या दहा वर्षांत सर्व प्रमुख जादूगारांनी जादूच्या प्रयोगामधील भयानकतेला पूर्ण फाटा दिला असून केवळ बहुढंगी करमणूक व्हावी अशा पद्धतीनेच आपले प्रयोग सादर केले आहेत. विविध प्रकारचे पोषाख करावयाचे, कधी अरबांच्या वेषात यायचे तर कधी जपानी–चिनी व्हायचे आणि प्रकाशयोजना आणि संगीत यांची साथ घेऊन आपले प्रयोग सादर करायचे. या बहुढंगी प्रकाराचे प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात स्वागत झाल्याने एकामागून एक सर्व जादुगारांनी याच पद्धतीने प्रयोग सादर करकरण्याचा सपाटा चालवला. नवीन प्रयोगावर पडणाऱ्या मर्यादा, आणि जादूच्या प्रयोगाला आलेला साचेबंदपणा यामुळे पुन्हा पुन्हा पहावे असे या प्रयोगात फारसे काही उरलेले नाही आणि तरीही वर्षभराचा खंड पडल्यानंतर एखादा रघुवीर किंवा सरकार उभा राहिला तर परिचित प्रयोग पहाण्यास ही मंडळी पुन्हा धाव घेतात. म्हणूनच के. लालसारखा जादूगार बालगंधर्वसारख्या भव्य रंगमंदिरामध्ये महिना-महिना गर्दी खेचतो.

गेल्याच सप्ताहात जादुगार बी. एन. सरकार पुण्यात येऊन दाखल झाले आहेत. जादुगार बी. एन. सरकार सुमारे तीस-पस्तीस वर्षांहून अधिक काळ या व्यवसायात असले तरी पुण्यात प्रथमच येत आहेत. त्यांचे वैशिष्ट्य असे की, ते प्रथम श्रेणीचे जादुगार असले तरी आपले प्रयोग स्वतःच्या तंबूमध्ये करतात. हा तंबूही तसा लहानसहान नाही. सर्कस-तंबूला जेवढी जागा लागते त्याच्या अर्ध्या जागेत ते आपला प्रपंच मांडू शकतात. त्यांचे प्रयोग पाहिल्यावर ते प्रथम श्रेणीचे जादूगार आहेत हे सहज लक्षात येते. कमतरता असली तर एवढीच की, लाल किंवा सरकार यांना तुम्ही बदिस्त नाट्यगृहामध्ये पाहता, तर बी. एन. सरकार आपले प्रयोग चक्क तंबूत दाखवतात. अर्थात ही कमतरता हेच त्यांचे सामर्थ्यही आहे आणि वैशिष्ट्यही आहे. स्वतःचा तंबू आणि ऐंशी मंडळींचा ताफा घेऊन सर्वत्र संचार करणारा बी. एन. सरकार हा एकमेव जादुगार आहे! प्रयोग संपल्यावर त्यांच्याबरोबर गप्पा मारल्या. ते म्हणाले, वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी घर सोडले ते जादू शिकण्याच्या वेडाने नादावूनच. आपण जर घर सोडले नसते तर फार तर क्लार्क किंवा हेडक्लार्क झालो असतो असे आज ते हसून म्हणतात. परंतु त्यांनी घर सोडले, त्या वेळी मात्र त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. घरच्या मंडळींचा त्याना कठोर विरोध होता; परंतु सरकार यांनी स्वतःपुरता निर्णय घेऊन टाकला होता. ते म्हणाले ' प. बंगालच्या नडिया जिल्ह्यामधील कृष्णनगर हे माझे गाव. जन्माने मी कायस्थ ब्राह्मण. घरामधील परिस्थिती सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबाप्रमाणे. घरामध्ये जादूगार वगैरे कोणी नव्हते; परंतु मला लहानपणापासून जादूची आवड. लहान-मोठ्या क्लृप्त्या योजून लोकांचे रंजन करण्यात मी दहाव्या वर्षीच नाव मिळवले होते. जादूची दुनिया हेच आपले जीवन, असे मी त्याच सुमारास निश्चित केले आणि वयाच्या दहाव्या वर्षी त्या वेळचे विख्यात जादूगार पी. दास यांच्या पथकामध्ये दाखल झालो. श्री. दास यांचे शिष्यत्व स्वीकारून मी या व्यवसायामधील अनेक बारकावे आत्मसात करून घेतले आणि आपल्या गुरूकडून तारीफ मिळवली आणि एक दिवस तर श्री. दास यांनी स्वतःच, बी. एन. सरकार एक दिवस जादूच्या क्षेत्रामध्ये फार मोठे नाव काढतील, असे एका कार्यक्रमामध्ये जाहीरपणे सांगितले. आज त्यांच्या गुरूचे भाकित खरे ठरले आहे. सरकार आज बिनीचे जादूगार आहेत. ऐंशी माणसांचा ताफा साभाळत ते आपला तबू घेऊन ते सर्वत्र संचार करत आहेत. अनेक मान्यवर राजकीय नेते, चित्रपट-कलावंत यांनी त्यांच्या प्रयोगांची तारीफ केली आहे, दिलीपकुमार या अभिनेत्याने तर श्री. सरकार यांच्या चिरंजिवांशी दोस्ती करून काही जादूचे प्रयोग शिकून घेतले आहेत. मी त्याना त्यांच्या व्यावसायिक अनुभवाबद्दल काही प्रश्न विचारले असता ते म्हणाले, अजूनही आपल्याकडे जादूगारांना समाजात मोठे सन्मानाचे स्थान नाही. जादू शिकवण्याची काही व्यवस्था नाही. वास्तविक जादू ही कला आहे, हे मान्य केल्यावर आणि भारतामध्ये या कलेची थोर परंपरा आहे हे लक्षात घेता जादूगारांसाठी सरकारने काही करायला नको का? विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था तुम्ही काढता. जादूचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी एखादी संस्था काढायला काय हरकत आहे? आमची एक संघटना आहे आणि त्या संघटनेने एक प्रस्तावही सरकारसमोर ठेवला आहे. मी स्वतः अशी संस्था निघाली तर काही काळ तेथे काम करण्यास तयार आहे; पण शेवटी याबाबत शासनानेच पुढाकार घेणे जरूर आहे. जादूचे एक शास्त्र आहे. जादूगार विलक्षण चतुर, प्रसंगावधानी आणि अत्यंत सफाईदार असावाच लागतो.

पृष्ठ २० वर

## एका नवीन युगाची ही सुरुवात—भांडवलदारांच्या पायांखालची वाळू सरकू लागली आहे.

# वणवा लपेट

लेखक : विजय परुळकर । लेखांक : नववा

३ एप्रिल १९८१. निपाणीच्या तंबाखू आंदोलनातील एक अविस्मरणीय दिवस. सुमारे पन्नास हजार शेतकऱ्यांनी आंदोलननगरापासून निपाणीतील हमरस्त्यावरून, बाजारपेठेतून एक नेत्रदीपक मोर्चा काढला. 'माणूस'चे संपादक श्रीभाऊ माजगावकर त्या दिवशी निपाणीत होते. मोर्चा पाहून ते भारावून गेले ते म्हणाले, 'हा विराट मोर्चा म्हणजे सत्याग्रही शेतकऱ्यांचा अजस्र आणि पवित्र असा जणू गंगौघ ! नुसत्या दर्शनानंदेखील पावन व्हावं अशी ही आगळी गंगा !'

मोर्च्याच्या आघाडीला शरद जोशी, सुभाष जोशी, बेग, धारिया वगैरे लोक होते. स्त्रियांचं नेतृत्व सुभाष जोशींची पत्नी सुनिताअक्का, प्रा. रमेश शिप्पुरकरांची पत्नी शोभाताई आणि संध्या हरदास ह्यांच्याकडे होतं. मोर्च्याच्या आघाडीची ओळ हमरस्त्यावरून बाजारपेठेत जाऊन दुसऱ्या रस्त्यानं आंदोलननगरकडे निघाली तेव्हा शेवटची ओळ निपाणीत येऊन पोहचली होती. संपूर्ण निपाणीला, बाजारपेठेला सत्याग्रही शेतकऱ्यांच्या मोर्चानं जणू गळफास घातला होता.

ठिकठिकाणी सुवासिनी शरद जोशींना ओवाळत होत्या, घागरीनं पायांवर पाणी ओतत होत्या. अनेक ठिकाणी निपाणीतील नागरिकांनी सत्याग्रहींसाठी थंडगार सरबताची सोय केली होती. निपाणीतील रस्ते, घरांचे ओटे, घरांची छपरं, बालकन्या सगळीकडं 'बघ्यां'ची गर्दी ! विस्मयचकित नजरेनं निपाणीकर हा मोर्चा पहात होते. शेतकऱ्यांची ही प्रचंड ताकद बघून तंबाखू व्यापाऱ्यांचं धाबं दणाणलं असल्यास नवल नाही.

मोर्च्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर कठोर निर्धार दिसत होता. १४ मार्चपासून रस्त्यावर ठाण मांडून बसलेला शेतकरी आज पाय मोकळे करण्यासाठी निपाणीत आला होता; पण एकटा नव्हे, संघटितपणे ! एकट्या शेतकऱ्याला निपाणीतील दलालाचं शेंबडं पोरसुद्धा हुडुत करून हाकलू शकत असे; पण संघटित शेतकऱ्याकडे नुसती मान वर करून पहाण्याचीदेखील आज दलालांची हिंमत नव्हती ! आपल्या संघटित शक्तीचा हा अनुभव घेत शेतकरी प्रत्येक पाऊल निश्चयानं उचलत होता. 'शेतकरी संघटनेचा विजय असो !' ही घोषणा देताना त्याचा स्वाभिमान ओसंडून वहात होता.

मोर्चा विलक्षण शिस्तबद्ध होता. पोलिसांचा शरद जोशींच्या नेतृत्वावर आतापर्यंत संपूर्ण विश्वास बसला होता. पन्नास हजार सत्याग्रही शेतकरी निपाणीतून मोर्चा काढणार होते; पण कुठंही पहाऱ्यावर पोलीस नव्हते. एरवी शंभरजणांच्या मोर्च्याला शिस्तीत ठेवण्यासाठी दोनशे पोलीस असतात असंच दृश्य शहारातील सत्याग्रहातून पहायला मिळतं, त्यामुळंच ह्या मोर्च्यातील पोलिसांचा अभाव जाणवण्याइतका स्पष्ट होता.

आंदोलननगर ते निपाणीतील हमरस्ते आणि परत म्हणजे जवळजवळ बारा किलोमीटरची पायपीट आणि तीदेखील रणरणत्या उन्हात ! शेतकरी तर चालत होतेच; पण त्याचबरोबर त्याच निर्धारानं चालणाऱ्या वयोवृद्ध गोपीनाथ धारियांचा उत्साह खरोखरीच वाखाणण्याजोगा होता. चालत असताना एका ठिकाणी दगडाला ठेचकळून धारिया पडले होते. त्यांच्या हाता-पायाला जबर मार लागला होता. त्यांच्या कपाळावर रक्ताचा टिळा उमटला होता तरी धारिया चालत राहिले !

निपाणीतील नागरिकांना विराटदर्शन देऊन सत्याग्रही आंदोलननगरास परतले आणि दुपारची न्याहरी आटोपून माळावरती सभेसाठी जमले.

एका ट्रेलरवर पाण्याची रिकामी टाकी ठेवून 'स्टेज' करण्यात आलं होतं आणि शरद जोशी हातामध्ये मायक्रोफोन धरून प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या श्रोत्यांना सांगत होते,

'आजचा दिवस मी माझ्या आयुष्यातील एक अत्यंत भाग्याचा असं समजतो. ज्या शेतकरी संघटनेचं मी काम करतो, त्या शेतकरी संघटनेवर शेतकऱ्यांनी इतका विश्वास दाखवला की, आजच्या कार्यक्रमाला किमान तीस हजार सत्याग्रहींची आवश्यकता आहे असं मी सांगितलं आणि तावडतोब अडतीस हजार सातशेचाळीस शेतकऱ्यांनी हजेरी लावली, त्यांच्या जोडीला सात-आठ हजार तंबाखू आणि विडी-कामगार स्त्रिया ! —

'निपाणी गावातून जेव्हा मिरवणूक निघाली तेव्हा सत्याग्रहींचा आकडा पंचेचाळीस हजाराच्यावर गेला असा पोलिसांचा अंदाज आहे. बहुतेक सगळ्या अधिकाऱ्यांची आणि व्यापाऱ्यांची अशी कल्पना होती की, आंदोलनात भाग घेणाऱ्यांची संख्या दिवसागणिक घटत जाऊन हजार-पाचशे इतकी होईल, आंदोलननगर हळूहळू मोकळं पडेल ! आज एकविसाव्या दिवशी त्या सगळ्यांच्या डोळ्यात क्षणक्षणीत अंजन पडलं आहे !

'ह्या एकवीस दिवसांच्या काळात सत्याग्रही शेतकरी कामासाठी अधूनमधून गावाकडे जात होते; पण त्याचा अर्थ आंदोलनावरची त्यांची निष्ठा ढळत होती असा नव्हे, हे आज सिद्ध झालं आहे. पोलिसांनी जर आज ह्या अडतीस हजार सातशेचेचाळीस शेतकऱ्यांना आणि सात हजार कामगार-स्त्रियांना अटक केली तर उद्या सत्याग्रही रस्त्यावर येऊन बसतील अशी मला खात्री आहे.

'दोन दिवसापूर्वी मी म्हटलं होतं की, आज जर पंचवीस हजार शेतकरी जमले नाहीत तर मी उपोषण सुरू करणार ! आपलं हे घरातलं भांडण होतं ते आता मिटलं. विनंती एकच की, आज आपण तंबाखूच्या लढ्याकरता जी जागरूकता दाखवली ती जागरूकता ह्या लढा संपेपर्यंत टिकवून धरा ! जेव्हा जेव्हा हाक येईल तेव्हा तेव्हा अगदी जेवणास बसला असाल तरी ताट बाजूला सारून आंदोलनासाठी धाव घ्या ! तंबाखूच्या लढ्यात तर ही गोष्ट महत्त्वाची आहेच; पण यापुढं शेतकऱ्याचे दुसरे लढे जेव्हा सुरू होतील तेव्हा त्याच्या पाठीमागं ह्याच कळकळीनं उभे रहा ही माझी एक विनंती लक्षात ठेवा !

'आज ज्या संख्येनं तुम्ही इथं जमलात ती संख्या कमीत कमी सहा तारखेपर्यंत टिकणं अत्यंत महत्त्वाचं आहे. पुढचे तीन दिवस आंदोलनाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यानंतरच घरची काय कामं असतील त्यांचा विचार करण्यात येईल.

'उद्यापासून सरकारला अजिबात झोप येऊ नये असे कार्यक्रम आम्ही आखले आहेत. उद्या सबंध दिवसभर निपाणी बंद ठेवण्यात येणार आहे. परवा रविवार आहे. निपाणीतील नागरिकांनी पाडव्यासाठी आणि पुढील दिवसासाठी जी काय खरेदी करायची असेल त्याची तरतूद करून ठेवावी. सोमवारपासून निपाणीमधील सर्व बँका बेमुदत बंद ठेवण्यात येतील. हे कार्यक्रम यशस्वी करायचे असतील तर पुढील तीन दिवसांत सत्याग्रहींनी मोठ्या संख्येनं आंदोलननगरात उपस्थित राहणं महत्त्वाचं आहे.

'आजचा दिवस खरोखरीच फार भाग्याचा ! ज्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना पिढ्यान् पिढ्या लुटलं त्याच्या घरावरून जाताना पन्नास हजार शेतकरी संयम राखून शिस्त पाळतील, शांतता राखतील असं पोलीस अधिकाऱ्यांना स्वप्नातदेखील खरं वाटलं नसतं–पण हा मोर्चा शांततेनं पार पडणार ह्याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नव्हती. ह्या अधिकारी मंडळींना अजून शेतकऱ्याची खरी ओळख झालेली नाही. अधिकाऱ्यांना सवय आहे शहरी आणि भाडोत्री गुंडांना तोंड देण्याची. त्यामुळं शेतकरीदेखील ह्या गुंडांप्रमाणेच वागणार असं त्यांना वाटणं स्वाभाविक आहे.

'भारतामधील शेतकरी गरीब असला तरी स्वाभिमानी आहे आणि तो अत्यंत शिस्तीनं वागू शकतो हे ह्या अधिकाऱ्यांना दाखवून तुम्ही त्यांना एक नवा धडा शिकवला आहे.

'ह्याच शांततेनं आणि शिस्तीनं आपल्याला पुढचा लढा चालवायचा आहे. एकवीस दिवस झाले म्हणजे फार काही अद्भुत घडलं असं समजून चालणार नाही. निपाणीतील तंबाखू कामगार-स्त्रियांनी नुसता कपभर चहा पिऊन सव्वीस दिवस लढा चालवून दाखवला आहे. आपल्याला ह्या लढा एकशेसव्वीस दिवस चालवायला काहीच हरकत नाही.

'कितीही कष्ट सोसावे लागले तरी आता माघार घ्यायची नाही. ज्या दिवशी तुम्ही जिंकणार त्या दिवशी समोरचा शत्रू इतका नामोहरम झालेला असेल की, पुन्हा तो कधी तुमच्याविरुद्ध उठूच शकणार नाही !

'आजपासून आपण एक अतिशय गंभीर आणि महत्त्वाचं काम हाती घेणार आहोत. आजपर्यंत ह्या शेतकरी आंदोलनाच्या संदर्भात शेतकऱ्यांच्याविरुद्ध जे जे गुन्हे घडले, त्या त्या गुन्ह्यांबद्दलचे खटले चालविण्याकरता इथं एक जनता न्यायालय स्थापन करण्यात आलं आहे. इथून पुढं शेतकऱ्यांच्या ह्या आंदोलनातल्या संदर्भातील गुन्ह्यांचे खटले फक्त ह्या न्यायालयासमोर चालविले जातील, असं मी जाहीर करतो. सरकारी अधिकारी, व्यापारी, मंत्री जे जे कोणी आंदोलनासंबंधाने आगळीक करतील त्यांच्यावरील खटले या न्यायालयासमोर चालविण्यात येतील. त्याखेरीज ज्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना आजपर्यंत लुटलं आहे, फसवलं आहे त्यासंबंधीचे खटले याच कोर्टासमोर येतील. इतकंच नव्हे तर नेहमीच्या कोर्टामध्ये त्यासंबंधीचा न्याय मिळविण्याचा शेतकऱ्याचा अधिकार कायम राहील.

'शेतकरी संघटनेच्या जनता न्यायालयासमोर आज पहिला खटला श्री. निंगाप्पा रामाप्पा भेंडवाडे, राहणार एकसंबा, तालुका चिकोडी आणि इतर पस्तीस हजार शेतकरी यांच्या वतीनं कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री श्री. गुंडूराव ह्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात येईल. कायदा जाणणाऱ्या तज्ज्ञ वकीलमंडळीसमोर हा खटला आता सुरू होत आहे.'

शरद जोशींचं भाषण संपलं. 'स्टेज'वर एक टेबलखुर्ची ठेवण्यात आली. जनतेच्या वतीनं तरुण वकील श्री. प्रभाकर अणवेकर यांची न्यायमूर्ती म्हणून निवड करण्यात आली. चिकोडीचे प्रसिद्ध वकील श्री. डी. बी. चौगुला हे आरोपपत्र दाखल करण्यासाठी उभे राहिले तेव्हा सारा समुदाय श्वास रोखून कानात प्राण ओतून ऐकू लागला. श्री. चौगुला आरोपपत्र वाचू लागले–

'माननीय न्यायमूर्तीजी, आपणासमोर हा दावा दाखल करण्याची कारणे खाली नमूद केली आहेत. हा दावा आपल्या कोर्टाच्या अधिकारात बसत असल्यामुळं आपणासमोर दाखल करण्यात आला आहे. दाव्यात नमूद केलेली वादीची नुकसानी (रुपये चौऱ्याऐंशी लाख, साठ हजार) प्रतिवादीकडून वसूल करून देण्याच्या अधिकारात बसत असल्यामुळं नुकसानभरपाईची मागणी ह्याच कोर्टापुढं केली आहे. एकूण दाव्याची रक्कम, कोर्ट-खर्च, वकील-फी वादीस प्रतिवादीकडून मिळावी.

'दि. २४–२–१९८१ रोजी निपाणी परिसरातील सर्व तंबाखू शेतकऱ्यांची परिषद भरली होती. त्या परिषदेत शासनाने तंबाखूची एकाधिकार खरेदी करावी किंवा आधारभूत किंमत जाहीर करावी

यासंबंधीचे निवेदन प्रतिवादी श्री. गुंडुराव यांना दि. ५–३–८१ रोजी पाठविण्यात आले. त्या निवेदनाच्या पोचपावतीची तारीख ७–३–१९८१ आहे.

'या निवेदनात शासनाचा निर्णय ७–३–१९८१ पर्यंत देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली होती. तंबाखूचा हंगाम १ मार्चला सुरू होऊन पावसाळ्याच्या सुरुवातीपर्यंतच चालत असल्यामुळं शेतकऱ्याचं नुकसान टाळण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेणं आवश्यक होतं. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून असा निर्णय त्वरेने देण्याची जबाबदारी प्रतिवादी श्री. गुंडुराव यांची होती.

'प्रतिवादीकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळं तंबाखू शेतकऱ्याला १४ मार्च १९८१ पासून आंदोलन सुरू करणं भाग पडलं. दि. १७ मार्च १९८१ रोजी शेतकरी संघटनेचं एक शिष्टमंडळ कर्नाटक राज्य शासनास व मुख्यतः प्रतिवादीस भेटलं.

'शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या योग्य असून त्याबद्दल आपल्याला सहानुभूती आहे, असे प्रतिवादी श्री. गुंडूरावांनी त्या वेळी सांगितले. त्या वेळी प्रतिवादीने अशा अर्थाचे निवेदन वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्याचा पुरावाही आहे. दिल्लीस जाऊन मध्यवर्ती शासनाकडून शक्य तितक्या तातडीने या प्रश्नाविषयी आपण निर्णय लावून घेऊ असे आश्वासनही त्यांनी दिले.

'या आश्वासनाप्रमाणे दि. १८ मार्च १९८१ रोजी प्रतिवादी श्री. गुडूराव हे दिल्लीस गेल्याचा पुरावा आहे. याबाबत त्यांनी दिल्ली येथे कोणत्या प्रकारची चर्चा केली किंवा प्रयत्न केले यास काहीही पुरावा नाही. दिल्लीहून मुंबईमार्गे बंगलोरला परत आल्यावर आपण केलेल्या प्रयत्नांची माहिती शेतकरी संघटनेस कळविण्याचा साधा शिष्टाचारही प्रतिवादी श्री. गुंडुराव यांनी पाळला नाही.

'दिनांक २६ मार्च १९८१ रोजी शेतकी खात्याचे सचीव श्री. विश्वनाथन् निपाणी येथे आले होते. त्यांनी तंबाखूसाठी सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन करण्यात यावा ही कल्पना मान्य केली. या योजनेचा तपशील तयार करण्यासाठी २८ मार्च रोजी को-ऑपरेटिव्ह सोसायटीज्चे रजिस्ट्रार निपाणीला येतील असे सांगितले.

'२८ मार्च रोजी रजिस्ट्रार ऑफ को-ऑप सोसायटीज् निपाणीला आले नाहीत. ते न येण्याबद्दल माहिती देण्याचा व कारणे कळविण्याचाही शिष्टाचार प्रतिवादी श्री. गुंडुराव यांच्या यंत्रणेनं पाळला नाही.

'दिनाक २ एप्रिल १९८१ रोजी रजिट्रार ऑफ को-ऑप सोसायटीज् श्री. रेड्डी हे निपाणीस आले; परंतु परिस्थितीची स्वतःच माहिती करून घेण्यापलीकडे त्यांनी काहीही केले नाही. प्रतिवादी श्री. गुंडुराव यांनी हेतुपुरस्सर केलेल्या दिरंगाईमुळे दिनाक १४-३-१९८१ पासून ७५ खेड्यांतील ३५००० वर तंबाखू उत्पादक शेतकरी पुणे–बंगलोर हमरस्त्यावर बसून सत्याग्रह करीत आहेत. त्यांच्याबरोबर ६०० बैलगाड्या व १२०० बैल त्या दिवसापासून उभे आहेत.

'शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीबद्दल कोणताही वादविवाद नसताना केवळ शेतकरी आंदोलन मोडून टाकण्याच्या इच्छेने प्रतिवादी श्री. गुडुराव निर्णय घेण्यास हेतुपुरस्सर दिरंगाई करत आहेत. प्रतिवादी श्री. गुडुराव या तऱ्हेची दिरंगाई तंबाखू व्यापाऱ्यांच्या दडपणाखाली येऊन करत आहेत. या दिरंगाईसाठी व शेतकरी आंदोलन मोडून काढण्यासाठी व्यापाऱ्याकडून श्री. गुडुराव यांनी मोठ्या प्रमाणावर लाच घेतली असावी असा निष्कर्ष निघतो.

'प्रतिवादी श्री. गुंडुराव हे आज जरी मुख्यमंत्री असले तरी यापूर्वी फसवाफसवी व लुच्चेगिरीच्या आरोपाखाली त्याना शिक्षा झालेली आहे. राजकीय कारणाकरिता त्यांच्यावरील हे खटले काढून टाकण्यात आले असले तरी आजसुद्धा पोलीस खात्याकडे त्यांच्या गैरवर्तणुकीची अनेक प्रकरणे आहेत.

'वर्तमानपत्राचे एजंट म्हणून प्रतिवादी पूर्वी काम करत असताना एका राष्ट्रीय वृत्तपत्राचे रु. १५०० /– त्यांनी अजूनही देणे आहे. हा त्याचा इतिहास पहाता ते करीत असलेली दिरंगाई केवळ राजकीय कारणाकरिताच नसावी असे मानण्यास आधार आहे.

'या त्यांच्या कृतीमुळे ३५००० शेतकरी स्त्री-पुरुष रस्त्यावर बसून आहेत. त्यांचा प्रत्येकी जीवनखर्च रोजी रु. १० /– येत आहे. त्याचप्रमाणे ६०० बैलगाड्यांचे व बैलांचे रोजचे भाडे रु. ३० /– प्रमाणे दररोज रु. ३,६८००० /– नुकसान होत आहे. गेल्या वीस दिवसांत या हिशोबाने रु. ७३,६०,००० /– इतके नुकसान झाले आहे. त्याखेरीज १५,००० टन तंबाखू पडून राहिला आहे. त्याची विक्री झाली असती तर मिळणाऱ्या रकमेवरील व्याजाचे दर दिवशी रु. ५०००० /– नुकसान झाले नसते. या तऱ्हेने प्रतिवादी श्री. गुडुराव यांच्या बेजबाबदारपणामुळे शेतकऱ्यांचे पहिल्या वीस दिवसातच व्याजापोटी १० लाख रुपयाचे नुकसान झाले आहे!

'आंदोलनाच्या काळात विडी-कारखानदार व वखारीचे मालक यांनी दोन दिवस आकसाने काम बंद ठेवल्यामुळे विडी कामगार-स्त्रियांचे रु. १ लाख नुकसान झाले आहे.

'शेतकरी आणि विडी-कामगार-स्त्रिया यांचे एकूण नुकसान दिनांक २ एप्रिल १९८१ पर्यंत रु. ८४,६०,००० /– इतके झाले आहे.

'माननीय न्यायमूर्तींनी या मागणीचा साकल्याने विचार करून प्रतिवादी श्री. गुडुराव यांना त्यांच्या पदाला अशोभनीय अशा बेजबाबदार वागणुकीबद्दल योग्य ती शिक्षा द्यावी व त्यांच्याकडून रु. ८४,६०,००० /–वसूल करून तंबाखू उत्पादक शेतकरी व विडी-कामगार याना देण्याची व्यवस्था करावी ही विनंती!'

आरोपपत्र दाखल करून घेतल्यानंतर प्रतिवादी श्री. गुडुराव ह्याना नोटिस काढताना जनता न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. प्रभाकर दणवेकर म्हणाले,

'वादीतर्फे श्री. डी. बी. चौगुला यांनी नुकसानभरपाईचे आरोपपत्र दाखल केले आहे. सदर आरोपपत्र सर्व जनतेसमोर वाचून दाखविण्यात आले आहे. हे आरोपपत्र दाखल करून घेण्यात आले असून त्याची नक्कल व कोर्ट समन्स् प्रतिवादींना ६–४–१९८१ पर्यंत लागू करावे.

## 'प्रतिवादी श्री. गुंडुराव यांच्याकडून चौऱ्याऐंशी लाख, साठ हजार रुपये वसूल करावेत!'

'कोर्टाचे कामकाज ता. ६–४–१९८१ रोजी दुपारी तीन वाजता पुढील सुनावणीसाठी सुरू होईल. त्या वेळी प्रतिवादीनी हजर राहून आपली बाजू मांडली पाहिजे. न आल्यास त्यांचे परोक्ष कोर्टाचे कामकाज पुढे सुरू होईल. त्या दिवशी वादीनी आपल्या सर्व साक्षी-पुराव्यानिशी हजर राहून पुढील कामकाजास सिद्ध असावे.'

जनता न्यायालयाचं पहिल्या दिवसाचं कामकाज संपलं. सभा बरखास्त झाली. एका गूढ गंभीर वातावरणात शेतकरी आपआपल्या छावणीवर परतले.

□

शनिवार. ५ एप्रिल १९८१. सकाळी नऊच्या सुमारास अकोळ, बेनाडी आणि कोगनूर ह्या फक्त तीन गावच्या तीन हजार शेतकऱ्यांनी आंदोलननगरीपासून 'निपाणी बंद' मोर्चा काढला. मोर्चा निघण्यापूर्वी सुभाष जोशींनं सूचना देताना सांगितलं,

'सत्याग्रहीनी एस्. टी. स्टॅंडपासून 'निपाणी बंद' कार्यक्रमाची सुरुवात करायची आहे. एस्. टया बंद पाडून गावातील इतरव्यवहार बंद रहावेत म्हणून शांततेनं मोर्चा काढायचा आहे. चिल्लर व्यापाऱ्यांना दुकानं बंद ठेवण्याची विनंती करायची आहे. हे काम अतिशय जबाबदारीनं पार पाडायचं आहे. व्यापाऱ्यांशी वितंडवाद घालायचा नाही, बळजबरी करायची नाही. जे व्यापारी विनंती मान्य करणार नाहीत त्यांचं फक्त नाव टिपून घ्यायचं आणि मोर्चा पुढं न्यायचा. कसलाही दंगा करायचा नाही. घोषणा द्यायला परवानगी आहे. सरकारी कार्यालये, बँका ह्यांचं कामदेखील बंद पाडायचं— पण शांतता राखून!',

शुक्रवारच्या विराट मोर्चानं निपाणीतील सर्व व्यवहार, बँकांचेदेखील, बंद होते. शनिवारच्या मोर्चामुळं निपाणी आणि बँका पुन्हा बंद. पाच तारखेला रविवारची सुट्टी. सहा तारखेपासून बँका वगैरे बेमुदत बंद म्हणजे निपाणीकराची—त्यातल्यात्यात व्यापाऱ्यांची-भलतीच अडचण होणार! पाडव्याचा सण साजरा करायला अडचण येणार. अर्थात किती निपाणीकर पाडवा साजरा करायच्या मनःस्थितीत असतील? गेले बावीस दिवस शेतकरी धरण धरून बसलेले. त्यांचा निर्णय लागत नाही तोपर्यंत इतर माणसं पाडवा तरी कुठल्या तोंडानं साजरा करणार?

मोर्चा गावात शिरला आणि बाजारपेठेतून जाताना एका कार्यकर्त्यानं नारा दिला 'लाल लाल पागोटं गुलाबी शेला' त्याच्यापाठोपाठ हजारो शेतकरी तालात म्हणाले 'देवचंद शहा मेला, त्याच्या मातीला चला!' एकएका गल्लीसमोर एकएका व्यापाऱ्याचं नाव घेऊन हा नारा सुरू झाला आणि बाजारपेठेत थोडी घबराट पसरली. कालचा मोर्चा विराट होता; पण संयमित. आजचा मोर्चा तीन-साडेतीन हजार शेतकऱ्यांचाच; पण त्यांच्या घोषणांमध्ये एक तिखट धार होती. मोर्चामध्ये शिस्त होतीच; पण घोषणांमधून मनात साचलेला अंगार उफाळून येत होता—आणि ते सहाजिकच होतं. चिडलेले शहरी कामगार मॅनेजमेंटच्या नावानं 'मुर्दाबाद' च्या घोषणा देतात तसाच काहीसा प्रकार. ह्या मोर्चाच्या आघाडीला शरद जोशी होते आणि 'लाल लाल पागोटं गुलाबी शेला' असा नारा देखील लावत होते. सत्यग्रहींच्या तुंबलेल्या भावना ते घोषणेद्वारे मोकळ्या करून देत होते.

अकोळ, बेनाडी आणि कोगनूर ह्या तीन गावच्या सत्याग्रहींनी निपाणीतील सर्व व्यवहार बंद पाडून मोर्चा यशस्वी केला. सकाळी नऊ वाजता बाहेर पडलेले सत्याग्रही दुपारी एक-दीडच्या सुमारास आंदोलननगरीत परतले तेव्हा इतर गावच्या शेतकऱ्यांनी त्यांचं प्रचंड उत्साहानं स्वागत केलं. ढोल, लेझीम, रणहलगीच्या जल्लोषात गुलाल उधळून त्यांना त्यांच्या छावणीपर्यंत इतरानी साथ केली.

दुपारी सर्व आंदोलक-शेतकरी विश्रांती घेत असताना चार-पाच कार्यकर्त्यांची एक तुकडी निपाणीत फेरफटका मारून 'बंद' पाळला जातोय की नाही ह्याची पाहणी करण्यासाठी बाहेर पडली. सुमारे तासाभरानं हे कार्यकर्ते परतले ते काहीसे चिडूनच! दोन-चार किरकोळ व्यापाऱ्यांनी शेतकरी संघटनेचा आदेश मोडून दुपारी दुकानं उघडी ठेवली होती.

संध्याकाळी माळावर भरलेल्या सभेत कार्यकर्त्यांनी पाच दुकानदारांचा नावं जाहीर केली आणि 'पाहून घेऊ' असा त्यांना इशारा दिला.

संध्याकाळी हे व्यापारी पळत पळत आंदोलननगरात आले. तिथं बरीच खडाजंगी झाली. वादावादी आवरण्यासाठी एस. टी. चौगुले म्हणाले—

'हे बघा, ह्यापूर्वी 'निपाणी बंद' आंदोलने झाली तेव्हा साधारण दुपारी दोन-तीन वाजेपर्यंत सर्व व्यवहार बंद असायचा. नतर मग हळूहळू दुकानाच्या एक-दोन फळ्या उघडून व्यापार सुरू व्हायचा आणि संध्याकाळपर्यंत सर्व व्यवहार सुरू व्हायचे, असा निपाणीचा रिवाज. शेतकरी संघटनेनं जो 'बंद' चा आदेश दिला तो मात्र पूर्णपणे पाळला जावा अशीच सर्व सत्याग्रहींची अपेक्षा होती.

'शेतकरी गेले बावीस दिवस रस्त्यावर बसून आहेत. काल आणि आज प्रथमच निपाणीतून मोर्चे काढण्यात आले. आज 'निपाणी बंद' चा आदेश देण्यात आला. तो संपूर्णपणे पाळला जावा अशी सत्याग्रहींची अपेक्षा असली तर ती गैर नाही. हा आदेश डावलून चार-पाच किरकोळ दुकानदारांनी दुपारी दुकानं उघडली म्हणून कार्यकर्ते चिडले—'

एस. टी. ना पुढे बोलू न देता घाबरलेले दुकानदार म्हणाले— 'अहो, आमचं चुकलं हे आम्हाला मान्य आहे आणि त्याबद्दलच आम्ही शेतकरी संघटनेची माफी मागायला आलोय; पण आमची एक तक्रार आहे. तुम्ही आम्हा पाच जणांची नावं जाहीर सभेत घेतल्यामुळं उद्या दुसरं कुठलंही आंदोलन सुरू झालं तर गुंडप्रवृत्तीचे लोक त्याचा फायदा घेऊन आमची दुकानं लुटतील अशी आम्हाला भीती वाटते. म्हणून आम्ही नाराजी व्यक्त केली. आम्ही 'बंद'चा आदेश तंतोतंत पाळला नाही ही आमची चूक झाली हे आम्हाला मान्य आहे.!'

दुकानदाराच्या स्पष्टीकरणावर कार्यकर्ते आणखीनच भडकले. मागील आंदोलनाच्या वेळी, निवडणुकीच्या वेळी ह्या दुकानदारांनी काय काय गैरप्रकार केले त्यावर वादंग माजला. दुकानदारांची परिस्थिती अगदीच केविलवाणी झाली तेव्हा सुभाष जोशीनी मध्यस्थी करून वाद मिटवला आणि दुकानदारांना आंदोलननगरीत येऊन पाडवा साजरा करण्याचं आग्रहाचं आमंत्रण देऊन निरोप घेतला.

दुकानदार निघून गेले. त्यांच्यापाठोपाठ निपाणीतील काही सुशिक्षित मंडळी आली आणि शरद आणि सुभाष जोशींच्या सभोवती घोळका करून बसली. ह्या मंडळींना *'लाल लाल पागोटं'* ह्या घोषणेमुळं इतके दिवस अतिशय उच्च पातळीवर चाललेल्या आंदोलनाचा दर्जा घसरला असं वाटलं होतं आणि आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी ही मंडळी आली होती. त्यांची समजूत काढताना शरद जोशी सांगत होते–

'अहो, एखादा खूप चिडला असला तर मानसोपचार करणारे तज्ज्ञ त्याला सांगतात, तुझ्या मनात इतका राग साचलाय ना? मग एका कोपऱ्यात जा, मोठमोठ्यानं शिव्या दे, आरडाओरड कर आणि मन रिकामं करून टाक! बावीस दिवस सत्याग्रहाला बसलेल्या सत्याग्रहींना मी जर नुसतंच थंड बसवून ठेवलं, काही कार्यक्रम दिला नाही तर हे सत्याग्रही आपल्या शिस्तीच्या चौकटीतून बाहेर पडून भलतीकडेच राग काढतील! सत्याग्रहीमध्ये नुसती शांतता ठेवणे एव्हढीच आमची जबाबदारी नाही तर खंदकात बसून राहिलेल्या आमच्या सैनिकांना कंटाळा येणार नाही हेदेखील *आम्हाला पाहिलं पाहिजे–आणि हे सर्वांत कठीण आहे!*

'आज घोषणा देताना एखाद्या व्यापाऱ्याचं नाव घेऊन 'अमुक अमुक मेला त्याच्या मातीला चला' असं आम्ही म्हणत होतो त्याचा अर्थ ती व्यक्ती मेली असा नसून त्याची जी घाणेरडी कर्मं आहेत, घाणेरडी वृत्ती आहे ती मेली असा आहे. ह्या घोषणेत वाईट काहीच नाही. ह्याउलट माझ्या भाषणामधून मी त्यांच्यावर जास्त कडक टीका करतो; पण व्यापाऱ्यांच्या ती लक्षातच येत नाही. कालच्याच भाषणात मी म्हणालो की, प्रभू रामचंद्राची पत्रिका देवचंदशेठच्या पत्रिकेपेक्षा वाईट होती असंच कुठलाही ज्योतिषी सांगेल–ह्या वाक्यामधला अर्थच त्यांना कळत नाही. त्याचप्रमाणे मी जेव्हा सांगतो की, ह्या व्यापाऱ्यांनी जे मिळवलंय, दहा पिढ्यांना पुरून उरावं इतकं साठवलंय ते सर्व मागं ठेवून त्याना जावं लागेल, आम्ही जेव्हा रीतसर खटले भरू तेव्हा त्यांना हे सर्व मागं ठेवून गाठोडी घेऊन तोंड काळं करावं लागेल–पण ह्या कडक इशारा त्यांना समजत नाही. 'लाल लाल पागोटं' ह्या घोषणेपेक्षा आमचा इशारा जास्त गंभीर आहे ह्याची मात्र त्यांनी वेळीच दखल घ्यावी.'

भेटीला आलेल्या सुशिक्षितांचं समाधान झालं की नाही कुणास ठाऊक! ते जाताना 'आंदोलनाचा दर्जा घसरला' ह्याच भाव चेहऱ्यावर कायम ठेवून गेले.

दर्जाचं काय झालं असेल ते असो; पण तीन आणि चार तारखेच्या मोर्चामुळं आंदोलननगरीत एक वेगळंच वातावरण पसरलं. निपाणी काळजीत बुडाली आणि पोलीसअधिकारी अस्वस्थपणे येरझाऱ्या घालू लागले हे मात्र खरं.

¤

१४ मार्च १९८१ च्या दुपारपासून पुणे-बंगलोर महामार्ग जरी निपाणीनजदीक बंद करण्यात आला होता तरी चिकोडीमार्गे एका लांबच्या समांतर रस्त्यावरून बरीच वाहतूक सुरू होती. मुंबई-बंगलोर वाहतूक संपूर्णपणेच जर बंद झाली तर अनेकांची गैरसोय झाली असती, म्हणून हा एक रस्ता मुद्दामच खुला ठेवण्यात आला होता; पण बावीस दिवस उलटले तरीही कर्नाटक सरकार जेव्हा आंदोलकांच्या मागण्यांना दाद देण्याचं लक्षण दिसेना तेव्हा शरद जोशींनी हा समांतर रस्तादेखील सोमवार दि. ६ एप्रिलपासून बंद पाडण्याचा निर्णय घेतला.

ह्या सत्याग्रहाची तयारी करण्यासाठी ५ एप्रिलच्या सकाळी शरद जोशी त्या परिसराच्या दौऱ्यावर निघाले. मी आणि सरोजानं त्यांच्याबरोबर जायचं ठरवलं. जोशींच्याबरोबर दत्ता पांगम होते. *आम्ही निपाणी सोडली तेव्हा गावात बरंच खळबळजनक वातावरण* होतं. गटागटानं व्यापारी चर्चा करत होते. तीन आणि चार एप्रिलचे मोर्चे, सोमवारपासून बँका बेमुदत बंद, चिकोडीमार्गे वाहतूक बंद ह्यामुळं निपाणीतील व्यापाऱ्याच्यात बरीच घबराट पसरली होती. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला आणि मोर्चाला उत्तर म्हणून 'जनता मोर्चा' काढायचा आणि आंदोलननगरीत घुसून शेतकऱ्यांना हुसकावून लावायचं असा काही तरी बेत व्यापारीमंडळी रचत होती. *निपाणीत व्यापाऱ्यांना मोर्चा काढणं सहज शक्य होतं–अर्थात त्यात* जनता कितपत सामील होणार हा खरा प्रश्न होता. व्यापाऱ्यांच्या मोर्चानं आंदोलननगरीत घुसून पस्तीस-चाळीस हजार शेतकऱ्यांना हुसकावून लावायचा प्रयत्न करणं म्हणजे शुद्ध वेडेपणा झाला असता.

निपाणी सोडण्याअगोदर शरद जोशींनी सूचना दिली की व्यापाऱ्यांनी मोर्चा काढला, घोषणा दिल्या, शेतकऱ्यांना चिथवण्या दिल्या तरी शांततेचा भंग होऊ द्यायचा नाही. सुभाष जोशींनी *त्यांना आश्वासन दिलं.*

चिकोडीजवळच्या दोन-तीन गावांना शरद जोशींनी भेट दिली. तेव्हा तेथील गावकऱ्यांत विशेष उत्साह दिसला नाही. स्थानिक पुढाऱ्यांच्यात बरेच मतभेद आणि सत्याग्रह करण्याबद्दल कसली तरी भीती असल्याचं जाणवलं. एक-दोन तरुण कार्यकर्ते सोडले तर 'रस्ता रोको'ची तयारी करण्यास कुणीच फारसं उत्साहानं पुढं येत नव्हतं. अशा वातावरणात ह्या भागात यशस्वी आंदोलन उभारणं जरा कठीणच. सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन शरद जोशींनी हा रस्ता रोकण्याबाबतचा निर्णय स्थगित केला आणि आम्ही दुपारी तीन-साडेतीनच्या सुमारास आंदोलननगरीत परतलो.

आंदोलननगरीनं एक वेगळंच रूप धारण केलं होतं–वातावरण एकदम 'चार्जड्'–तप्त! शरद जोशी गाडीतून उतरताच हजारो शेतकऱ्यांनी त्यांना घेरलं आणि मोठमोठ्यानं घोषणा दिल्या. सर्वांना शांत करत शरद जोशींनी एका झाडाच्या सावलीत सर्वांना बसवलं. चिडलेल्या सत्याग्रहीकडून जे समजलं त्याचा थोडक्यात सारांश असा–

दुपारी बाराच्या सुमारास तंबाखूव्यापारी, त्यांचे चमचे ह्यांनी भाडोत्री गुंडांना हाताशी धरून निपाणीत मोर्चा काढून धुमाकूळ घातला. गोपीनाथ धारियाच्या घरावर तुफान दगडफेक केली. सुभाष जोशींच्या घरावर तुफान दगड फेकले. त्यांच्या दाराशी उभ्या असलेल्या माझ्या मोटारसायकलीची मोडतोड केली. आणखी

**'या व्यापाऱ्यांनी जे मिळवलंय ते सर्व मागे ठेवून त्यांना जावं लागेल!'**

दोघांच्या मोटारसायकली मोडल्या. निपाणीत फिरणाऱ्या काही शेतकऱ्यांना मारहाण केली आणि हे सर्व चालू असताना पोलिसांनी फक्त बघ्याची भूमिका पार पाडली. कसलाही हस्तक्षेप केला नाही.

शेतकऱ्यांचं म्हणणं होतं, पन्नास हजार सत्याग्रहींनी निपाणीतून मोर्चा काढला तेव्हा रस्त्यावरील मुंगीलादेखील धक्का लागला नाही आणि मूठभर व्यापारी आणि त्यांच्या शे-पन्नास चमच्यांनी मात्र मोर्चाचं निमित्त सांगून धुमाकूळ घातला तेव्हा कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेले पोलीस गप्प का बसले ?

शरद जोशींनी सर्व परिस्थिती समजावून घेतली आणि संध्याकाळच्या सभेत काही महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात येतील असं आश्वासन दिलं.

संध्याकाळी साडेचार-पाचच्या सुमारास माळावर तुफान गर्दी लोटली. प्रत्येक गावच्या तरुण शेतकऱ्यानं हातामध्ये लाठी धरली होती. लाठीला भगव्या रंगाचं निशाण लावलं होतं. माळरानावर सर्वत्र भगवा रंग फडफडत होता. वातावरण विलक्षण भारावलेलं, नांगरधारी शेतकऱ्यानं नांगर टाकून हातामध्ये भगवं निशाण धरलं होतं. दिंडीमधील पताका वेगळ्या—ह्या भगव्या निशाणाचा अर्थ वेगळा!

झटपट उभारण्यात आलेल्या 'स्टेज' वरून कामगार-नेत्या अक्काताई कांबळे गर्जत होत्या.

'शेतकरी बांधवांनो आणि माझ्या मायबहिणीनो, आपण सर्व गेले बावीस दिवस इथं 'रस्ता रोको' आंदोलनात बसून आहोत. आपल्या पोलीस डिपार्टमेन्टचे कान आणि डोळे मात्र अजूनही बंदच आहेत असं दिसतंय.

'काल इकडची सभा संपवून मी परत जात असताना निपाणीमध्ये पेठकरांचा (व्यापाऱ्यांचा) चमचा इमाम गौंडी मोर्चा काढण्याची तयारी करत होता. त्याला मी सांगितलं की पेठकऱ्यांच्या चमच्यांचे मोर्चे आम्ही चालू देणार नाही, त्या इमाम गौंड्याला दहा-पाच जणांनी माझ्यापासून झाकून ठेवलं. मी म्हणाले, ह्या गौंड्याला लपवू नका. मागे एकदा आम्ही चपलेनं त्याची पूजा केली होती! पुन्हा तशीच पूजा केली पाहिजे.

'आज सकाळी नऊ वाजता मी आंदोलननगराकडे येत असता हे पेठकऱ्यांचे चमचे, दोन-पाच रुपये घेऊन, दारू पिऊन गुंडगिरी करण्यासाठी वेणीचंद दोशीच्या वखारीसमोर थांबले होते. मला ह्या लोकांनी वेणीचंदच्या वखारीसमोर अडवलं आणि भीती घातली की रस्ता अडवलाय, तुम्ही तिकडून जाऊ नका, पोलीस डिपार्टमेन्ट तुम्हाला सोडणार नाही!

'—ह्या व्यापाऱ्यांच्या मोर्चाला दूर सारून मी निघाले तेव्हा गुंडगिरी करणारे दलालांचे पित्ते आणि व्यापाऱ्यांच्या कार्ट्यांनी मला मुकाट्यानं वाट करून दिली. एक फौजदार मला म्हणाला, 'बाई, जास्त बोलू नकोस!' मी म्हणाले, 'अरे नालायका, तुला काय करायचं ते कर मी एकटीच आहे. तुझ्या लाठीला किंवा गोळीबाराला मी भीत नाही. तुला माझी भीती वाटत असेल तर ह्या माझ्या बांगड्या हातात भर!

'ह्या इमाम गौंड्याला आणि दलालांच्या कार्ट्यांना हातात बांगड्या भरवून, लुगडी नेसवून एक दिवस निपाणीतून हिंडवलं नाही तर माझं नाव बदलून टाका!

'एका पोलीससाहेबानं वेणीचंदच्या वखारीत काल भाषण करून सांगितलय की, हे आंदोलन आम्ही उद्या सहा तारखेला संध्याकाळच्या आत उठविणार! माझ्या शेतकरी बांधवांनो, मला तुम्हाला एकच सांगायचंय, डीएसपी काय पण त्याचा बाप आला तरी तुम्ही रस्त्यावरून उठू नका! ज्या वेळेला हे दलाल शेतकऱ्यांच्या पाया पडतील तेव्हाच हे आंदोलन संपणार, त्याआधी नाही! आमच्या तंबाखूला योग्य भाव मिळाल्याशिवाय आम्ही हलणार नाही, आम्हाला खुशाल अटक कर, असं डीएसपीला सांगायचं.

'शेतकरी बांधवांना माझी विनती आहे, तुम्ही कामगार-स्त्रियांच्या फक्त पाठीशी उभे रहा, मग ह्या पेठकऱ्यांना आम्ही कसं रडवतो ते बघा! इथून पुढं शेतकऱ्याचं आणि कामगाराचं राज्य येणार, दलाल व्यापाऱ्यांना लुगडी नेसून तोंड काळं करावं लागणार हे निश्चित!

'शेतकरी बांधवानो, तुमच्या तंबाखूला भाव मिळेपर्यंत तुम्ही आंदोलन अजिबात मागे घेऊ नका! तुमच्यासाठी आम्ही आपल्या रोजगाराची, मुला-बाळाची सुद्धा फिकीर करायची नाही असं ठरवलंय. ज्या वेळेला शरद जोशींनी आणि सुभाष जोशींनी हे आंदोलन उभारलं त्याच वेळेला आम्ही विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रियांनी जाहीर केलं की, तुमचा—आमचा वैरी एकच आहे तो तुम्हाला आणि आम्हाला लुटून गबर झालाय!

'वखारीतील आमचं काम बंद पडलं तर आम्ही दगड फोडून पोट भरू, पण आता ह्या दलालांना सोडणार नाही! आम्ही आमच्या नवऱ्यांना पण सांगितलंय की, जरी आम्ही तुमच्या लग्नाच्या बायका असलो तरी आंदोलन चालू आहे तोपर्यंत तुमच्या कुणी नव्हेत. आम्ही आंदोलनाच्या सत्याग्रही!'

अक्काताई कांबळेच्या ओजस्वी भाषणाला हजारो आंदोलकांनी 'शेतकरी कामगार एकजुटीचा विजय असो!' ह्या घोषणेनं प्रतिसाद दिला. अक्काताई कांबळेंच्या नंतर अकोळच्या युवकसंघाचा आय. एन. बेग बोलायला उभा राहिला. बेगच्या डोळ्यात चवताळलेल्या चित्त्याचे भाव होते. आवाजाला कडवट धार चढली होती. स्वत:च्या भावनांना आवर घालण्याचा प्रयत्न करत बेग म्हणाला—

'सगळ्या तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या वतीनं आमच्या वाघिणींना, आमच्या ह्या तंबाखू आणि विडी कामगार भगिनींना मी सर्वांत प्रथम लवून मानाचा मुजरा करतो. शेतकऱ्याला त्यांनी जो अभूतपूर्व पाठिंबा दिला आहे त्याला इतिहासात तोड नाही!

'काल संध्याकाळपासून निपाणीमध्ये जाणूनबुजून दहशतीचं वातावरण निर्माण करण्यात येत आहे. निपाणीतील तंबाखूव्यापाऱ्यांनी, त्यांच्या पैशावर निवडून आलेल्या आमच्या आमदारमंडळींनी इथून पुढं सत्याग्रही शेतकऱ्यांना निपाणीत पाय ठेवू द्यायचा नाही असा चंग बांधला होता. त्यांनी निपाणीत येण्याचा मार्ग रोखला होता; पण त्यांचा हा प्रयत्न कामगार-स्त्रियांनी उधळून लावला.

'निपाणीमध्ये आज सकाळपासून व्यापारी आणि भाडोत्री गुंडांनी शरद जोशींची बदनामी चालवली होती. सुभाष जोशींची बदनामी चालवली होती. धारियांच्या आणि सुभाष जोशींच्या घरांवर ह्या गुंडांनी तुफान दगडफेक केली. आमच्या एका पत्रकार पाव्हण्यांच्या

फटफटीची नासधूस केली,शिरपेवाडीच्या एका शेतकऱ्याची फटफटी-देखील ह्या मंडळींनी मोडली, हा सर्व प्रकार कळताच अकोळ, मह्मदापूर वगैरे भागातून फार मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांची तरुण मुलं आज इथं सभेला जमली आहेत.

'आज इथं ज्या प्रचंड संख्येनं शेतकरी सभेला जमले आहेत तो तंबाखू व्यापाऱ्यांना अखेरचा इशारा आहे. गेले तीन आठवडे हा शेतकरी जो रस्त्यावर बसून आहे तो केवळ टाळ कुटून भजनं म्हणण्यासाठी आलेला नाही. सरकारनं आता शेतकऱ्याचा अधिक अंत पाहू नये ! व्यापाऱ्याना मी सागू इच्छितो की, ह्या शेतकऱ्याला डिवचायचा कृपया प्रयत्न करू नका ! निपाणी भागातील माझ्या मुसलमान बांधवांनादेखील मी एक विनंती करू इच्छितो आणि ह्या विनंतीचा त्यानी गंभीरपणे विचार करावा.

'आजपर्यंत निपाणीमध्ये सतत एक अतिशय खालच्या पातळीचं राजकारण खेळलं जातंय. आमच्या मुसलमानांच्या काही दाडगट पोरांना पुढं करून शेतकऱ्यांचं आदोलन उधळून लावण्याचा बालिश प्रयत्न आज निपाणीतील व्यापाऱ्यांनी आणि त्यांच्या चमच्यांनी केला. निपाणीच्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्येच दोन प्रवाह स्पष्ट दिसू लागले होते. निपाणीमध्ये मुसलमानाचे पाच मोहल्ले आहेत; पण त्यांतील बागवानाचा मोहल्ला एकीकडे म्हणजे व्यापाऱ्याच्या बाजूला आणि इतर चार मोहल्ले सर्वसामान्य जनतेच्या बाजूला असं चित्र दिसत आहे. चार मोहल्ले पुरोगामी विचारसरणीच्या लोकांबरोबर; पण बागवान मोहल्ला मात्र नेहमी मानवी, कुरबेही, कोठीवाले आणि देशमाने ह्या चांडाळचौकडीच्या मागे ! ह्या बागवानांनी संपूर्ण मुस्लिम जमातीला काळं फासलं आहे !

'ह्या बागवान मुसलमानांच्यातील काही व्यापारी आहेत, काहींचा ट्रकचा व्यवसाय आहे गेल्या निवडणुकीला ह्या लोकानी पैशाची सौदेबाजी करून संपूर्ण बागवान मोहल्ला व्यापाऱ्याच्या पाठीशी दिला तेव्हापासून आमच्या भागातील मुस्लिम समाजात फूट पडली. माझ्या ह्या बागवान बांधवाना मी एक इशारा देऊ इच्छितो; तुम्ही कांदे-बटाटे–लसूण वगैरे विकण्यासाठी खेडोपाडी फिरता. हा धंदा चालला तरच तुमचं पोट भरेल अशी परिस्थिती आहे.

'शेतकऱ्याच्या तंबाखूला योग्य भाव मिळून त्याच्या हाती चार पैसे आले तरच बागवांनाना देखील पोटा-पाण्यासाठी काही कमवता येईल. निपाणीमधील चिल्लर व्यापार करणारे जे बागवान आहेत ते सगळे निपाणीच्या परिसरातील शेतकऱ्यावर अवलंबून आहेत.

'आमचे बागवानभाई जर व्यापाऱ्याच्या चिथावणीनं शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न करणार असतील, मस्तवालपणा करणार असतील तर त्याना मी सागतो की, इथून पुढं प्रत्येक खेडं त्यांच्यावर संपूर्ण बहिष्कार घालील ! शेतकऱ्यानी जर बागवानांना खेड्यात प्रवेश बंद केला किंवा त्यांचा माल घ्यायचा नाही असं एकमुखी ठरवलं तर बागवानभाईंवर उपाशी मरण्याची वेळ येईल ! त्यांना जर स्वतःच्या हातानं स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घ्यायचा नसेल तर त्यांनी वेळीच सावध होऊन व्यापाऱ्याचा नाद सोडावा आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं रहावं. आम्ही झालं गेलं विसरून जायला तयार आहोत !

'आज सकाळपासून निपाणीत आणखी एक अत्यंत हीन दर्जाचा प्रचार सुरू आहे. शरद जोशी ब्राह्मण आहेत, सुभाष जोशी ब्राह्मण आहेत. ह्या ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली जनसंघाचे एजंट घुसले आहेत वगैरे अतिशय खालच्या पातळीचा प्रचार व्यापाऱ्याच्या चमच्यानी सुरू केला आहे !

'शेतकऱ्यांच्या वतीनं मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, लढा कुणा ब्राह्मणासाठी, हरिजनासाठी, मराठ्यासाठी, लिंगायतासाठी किंवा मुसलमानासाठी चाललेला नाही. हा तबाखू उत्पादक शेतकऱ्याचा, शेतमजुराचा आणि कामगार–स्त्रियाचा दलालाविरुद्ध एकत्रितपणे चाललेला लढा आहे. इथं जातीचा, धर्माचा, भाषेचा कसलाच प्रश्न निर्माण होऊ शकत नाही. असले खोटे प्रश्न निर्माण करून आंदोलनात फूट पाडण्याचा प्रयत्न करणं हे व्यापाऱ्यांच्या हिणकस मनोवृत्तीचं लक्षण आहे !

'मी स्वत. मुसलमान आहे. ह्या भागातील मुसलमान शेतकऱ्यांच्या वतीनं मी सागतो की शरद जोशी हे आम्हा शेतकऱ्यांच्या दृष्टीनं किसानाच्या क्रातीचे पैगंबर आहेत !'

टाळ्यांच्या कडकडाटानं माळ थरारून उठला. आय. एन. बंगनंतर श्री. महंमद नाईक 'स्टेज'वर आले.

'आज आपल्या सर्वांचा गुढी पाडव्याचा म्हणजे आनंदाचा दिवस ! निपाणीमधील रहिवाशानी आपआपल्या घरावर गुढ्या उभारून आजचा सण साजरा केला आहे. आदोलननगरातील ह्या सभेला आज आपण सगळेजण हातामध्ये ज्या नवीन प्रकारच्या गुढ्या घेऊन हा सण साजरा करण्याच्या मनःस्थितीत आहात त्यावरून मी एव्हढंच म्हणतो की ह्या गुढ्या सणाच्या नसून क्रातीच्या आहेत ! ह्याचाच अर्थ आपला विजय आता फार लाब नाही !

'निपाणीमध्ये इतके दिवस शांत बसून आपली टिंगल–टवाळी करणारी व्यापारीमंडळी काल रात्रीपासून गडबड करू लागली आहे. आपण मात्र अजून शांत आहोत आणि शांतच रहाणार आहोत ! आपण शांत असताना आपला शत्रू जर गडबड करू लागला तर आपला विजय निश्चित असं समजावं.

'निपाणीमध्ये आज जो दंगा झाला, दगडफेक झाली त्यामध्ये अनेकाचे हात आहेत. ह्या भाडोत्री गुंडाबरोबर दगडफेक करण्यात आघाडीवर 'शांतता कमेटीचे' डॉ. वराळे होते ह्यातच काय ते समजून घ्या ! पोलिसाना जर खरोखरीच शांतता प्रस्थापित करायची असेल तर त्यांनी शांतताभंग करणाऱ्या ह्या शातता कमिटीच्या मेंबरचं नाव टिपून घ्यावं आणि कुठं जर दगडफेक किंवा हिंसाचाराचा प्रकार घडला तर प्रथम ह्या डॉ. वराळेंना अटक करावी !

'ह्या डॉक्टरमहाशयानी काही दिवसापूर्वीच आंदोलननगरात येऊन गोड गोड भाषण करून शेतकऱ्याना पाठिंबा व्यक्त केला आणि काल रात्री नेहरू चौकात हाच माणूस जाहीर सभेत म्हणतो

**'आजच्या या गुढ्या सणाच्या नसून क्रांतीच्या आहेत; आता विजय फार लांब नाही !'**

की, शरद जोशी ब्राह्मण असून जनसंघाचा एजंट आहे ! ह्याच डॉक्टर वराळे पुढं म्हणतो की, उद्यापासून शेतकऱ्यांना निपणीत प्रवेश करू दिला जाणार नाही !

'माझी शेतकरी बांधवाना आणि कामगार-स्त्रियांना अशी विनंती आहे की, त्यानी डॉ. वराळेयांचा हा डबल रोल कधीही विसरू नये !

'ज्या लोकांनी आज धारियांच्या आणि सुभाष जोशीच्या घरावर दगडफेक केली, त्याना आम्ही सांगू इच्छितो की, ह्या दगडफेकीची पावती कधी द्यायची ते आम्ही शरद जोशीना विचारून ठरवू. तोपर्यंत ही दगडफेक आम्ही उधारीवर स्वीकारली आहे असं व्यापाऱ्यानी समजावं !

'आज ह्या सभेत एक गोष्ट मला नमूद केलीच पाहिजे ! सकाळी दहा वाजता निपाणीमध्ये व्यापारी आणि चमच्यांनी प्रतिमोर्चा काढून गडबड सुरू केली तेव्हा नेहरू चौकामध्ये मोहन बुडके आणि त्याच्या युवक सघानी ह्या व्यापाऱ्यांना कडाडून विरोध केला.सभेला जमलेल्या नागरिकाना शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे पटवून दिली आणि व्यापाऱ्यांच्या तथाकथित जनता मोर्चामधील सगळी हवाच काढून घेतली! मोहन बुडकेच्या भाषणानंतर जनता घरोघर शांतपणे परतली आणि मोर्च्यात फक्त व्यापारी, त्यांचे चमचे आणि भाडोत्री गुंड उरले. शेतकऱ्यांच्या वतीनं मी मोहन बुडकेंचे जाहीर आभार मानतो!'

श्री. महंमद नाईकाच्यानंतर अत्यंत कृश शरीराच्या श्री. दत्ता पांगम ह्याचं भाषण झालं. शेतकरी संघटनेच्या नेत्याचा उल्लेख 'प्रातःस्मरणीय शरद जोशी' असा करून पांगमानी निपाणीतील दलालांच्यावर कडाडून हल्ला चढवला. त्यांच्यानंतर गोपीनाथ धारिया बोलायला उभे राहिले. तीन एप्रिलच्या विराट मोर्चात बारा किलोमिटरची पायपीट करताना ते अडखळून पडले होते. त्याच्या सर्वांगाला दुखापत झाली होती. सकाळी व्यापाऱ्याच्या गुंडांनी त्यांच्या घरावर तुफान दगडफेक करून सर्व खिडक्या फोडल्या होत्या;—पण 'भाई' खचले नव्हते. शेतकरी संघटनेच्या तंबाखू-आंदोलनासाठी तनमनधन अर्पण करण्याची तयारी दाखवून '—पुन्हा पेटवा मशाली' हे तत्त्व उराशी बाळगून त्यानी आव्हानपूर्वक भाषण केलं आणि निपाणीतील कुठल्याही व्यापाऱ्याबरोबर दोन हात करण्याचा, वैयक्तिक युद्ध करण्याचा विडा त्यांनी उचलला.

निपाणीच्या आंदोलननगराजवळील माळावरच्या सत्याग्रही शेतकऱ्यांच्या महासागरावर प्रलयंकारी लाटेप्रमाणे थरारणाऱ्या क्रांतीच्या भगव्या निशाणांनी मावळत्या सूर्याच्या रक्तरंजित किरणाचा स्पर्श होताच पेट घेतला आणि सुभाष जोशी भाषण करण्यासाठी उभा राहिला. आंदोलनकाळातील त्यांचं हे पहिलं भाषण ! आंदोलनाच्या व्यवस्थापनात गर्क असलेला हा मनस्वी कार्यकर्ता रोज संध्याकाळी भरणाऱ्या सभेत भाषण करण्यासाठी कधीच पुढं आला नाही— त्याच्यापाशी तो वेळच नसायचा. आज मात्र अनेकांच्या इच्छेला मान देऊन तो व्यासपीठावर उभा राहिला. त्यानं बोलायला सुरुवात करायच्या अगोदरच टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटानं त्याचं स्वागत करण्यात आलं आणि मग सगळे आंदोलक सावध चित्तानं 'सर' काय सांगतात ते ऐकण्यास सिद्ध झाले. वाऱ्यानं अस्ताव्यस्त झालेले केस डाव्या हातानं आवरत सुभाष जोशी म्हणाले,

'या ठिकाणी जमलेल्या माझ्या शेतकरी बांधवानो आणि मायबहिणींनो, आंदोलन सुरू होऊन बावीस दिवस झाले तेव्हा अनेकांच्या मनात चुटपुट सुरू झाली. अनेकांच्या मनात आंदोलन कुठं तरी चुकलंय का काय अशी शंका डोकं वर काढू लागली. आज निपाणीत जे घडलं त्यावरून माझ्या मनाची शंभर टक्के खात्री पटली आहे की, आपलं आंदोलन अगदी बरोबर मार्गावरून चाललं आहे. जोपर्यंत ही व्यापारी मंडळी शिव्या देत नव्हती, रस्त्यावर येत नव्हती तोपर्यंत वाटायचं, आंदोलन चुकलंय का काय ?— पण आज जेव्हा व्यापाऱ्यांनी रस्त्यावर येऊन आपलं खरं स्वरूप प्रकट केलं त्याचाच अर्थ बावीस दिवस आपण शांतपणे रस्त्यावर बसल्याचं सार्थक झालं !

'आज व्यापाऱ्यांनी जो जनतामोर्चा काढला त्यात दीडशे माणसंसुद्धा नव्हती. दहा व्यापारी आणि एकशेचाळीस भाडोत्री गुंड हा 'विराट जनता मोर्चा' आंदोलननगरावर चाल करून येणार अशा वल्गना व्यापाऱ्यांचे चमचे करत होते, तेव्हा पन्नास हजार शेतकरी मोठ्या उत्कंठेनं हा मोर्चा कधी आपल्या तावडीत सापडतो म्हणून वाट बघत होते. 'जनता मोर्चा' आंदोलननगरात आणायची व्यापाऱ्याची अर्थातच छाती नव्हती. त्यांची पोटं मोठी आहेत; पण छाती दीड इंची !

'आमच्या कामगारभगिनी अक्काताई कांबळे आणि ताजनबाई नालबंद ह्या दोघीनीच व्यापाऱ्यांच्या मोर्चाची दाणादाण उडवली ! ह्या दोघी मोर्च्याला सामोऱ्या गेल्या तेव्हा व्यापाऱ्याच्या चमच्यांनी भाडोत्री गुंडांना सांगितलं—ह्या दोघीना अडवू नका ! अडवलंत तर चोहोबाजूनी मधमाशांचं मोहोळ उठल्याप्रमाणे कामगार-स्त्रिया येतील आणि आपली चटणी करून टाकतील ! गुंडानी ह्या दोघीना मुकाट्यानं वाट करून दिली. संघटनेची ताकद किती असते ते ह्या उदाहरणावरून शेतकऱ्यांनी ध्यानात घेण्यासारखं आहे. निपाणीतील दलालांना कामगार-स्त्रियांच्या संघटनेचा हिसका माहीत आहे. आता शेतकरी आणि कामगार एकजुटीचा आणि शेतकरी संघटनेचा हिसका कळायची वेळ आली आहे.

'शेतकऱ्यांनी मोर्चा काढला तेव्हा निपाणीतील घराघरातील भगिनींनी येऊन शरद जोशीच्या पायावर घागरीनं पाणी घातलं. याउलट आज व्यापाऱ्याचा मोर्चा घरावरून जाताना ह्याच भगिनींनी दारं-खिडक्या बंद करून घेतल्या ! शेतकऱ्यांचा मोर्चा आणि व्यापाऱ्यांचा मोर्चा ह्याला निपाणीच्या नागरिकांनी दिलेला वेगवेगळा प्रतिसाद फार अर्थपूर्ण आहे.

'शरद जोशीनी सांगितलंय की आज रात्री पन्नास हजार सत्याग्रही आंदोलननगरात मुक्कामाला आणा ! उद्या सहा तारखेला बँका बंद पाडण्यासाठी निपाणीमधून जेव्हा सत्याग्रहीचा मोर्चा काढण्यात येईल तेव्हा सगळे व्यापारी, दलाल गाव सोडून पळून गेलेले असतील !

'आज ह्या व्यापाऱ्यांनी एक डाव रचला होता. त्यांना वाटत होतं की, धारियांच्या आणि माझ्या घरावर दगडफेक केली की, आंदोलन-

नगरातील शेतकरी चिडून गावात घुसतील. त्यांची आणि भाडोत्री गुंडांची मारामारी सुरू झाली की पोलीस त्याचं निमित्त करून बळाचा वापर करून आंदोलननगर मोडून रस्ता खुला करतील; पण सत्याग्रही शेतकऱ्यांनी संयम पाळला. व्यापाऱ्यांच्या ह्या कारस्थानाला ते बळी पडले नाहीत !

'१३ नोव्हेंबर १९८० रोजी निपाणीमध्ये जे आंदोलन झालं तेव्हादेखील व्यापाऱ्यांच्या भाडोत्री गुंडांनी माझ्या घरावर दगडफेक केली. आमच्या घराला दगडफेक नवीन नाही. घराला आता सवयच झाली आहे आणि वर्षातून एकदाही दगडफेक झाली नाही तर भिंत ढासळते. दगडफेक झाली तर मात्र भिंती वाढतात. आज पाडव्याच्या शुभमुहुर्तावर आम्हाला चांगला नजराणा मिळाला म्हणून मला समाधान आहे. १३ नोव्हेंबरला माझ्या घरावर दगडफेक झाल्यानंतर मलाच अटक करण्यात आली. उद्या पुन्हा असंच घडल्यास नवल नाही.

*'हे पोलीस आणि त्याचे मोठे अधिकारी आम्हाला नेहमी सांगत असतात — 'आमचं काम शांतता आणि सुव्यवस्था, हा आणि तो असा फरक आम्ही करत नाही !' आज निपाणीत व्यापाऱ्यांनी आणि त्यांच्या भाडोत्री गुंडांनी दंगा केला, त्यांच्यापैकी एकाला तरी पोलिसांनी अटक केली का ?—नाही ! आणि होणारही नाही !*

'—आज शेतकरी, शेतमजूर आणि कामगार सर्व भेद विसरून, खांद्याला खांदा लावून आंदोलन लढवीत आहेत. एका नवीन युगाची ही सुरुवात आहे. भांडवलदारांच्या पायाखालची वाळू सरकायला लागली आहे !

'आज गुढीपाडवा आहे असं म्हणतात; पण माझ्या दृष्टीनं हा नष्ट पाडवा आहे. जोपर्यंत इकडचा व्यापारी नष्ट होत नाही तोपर्यंत गुढ्या उभारणं आणि गोडधोड खाणं शेतकऱ्याला परवडणार नाही. आज आंदोलननगरात आपण ज्या गुढ्या उभारल्या त्या निर्धाराच्या गुढ्या आहेत !

'इथं आलेला प्रत्येक शेतकरी घरातून येताना बायकोचा आणि मुला-बाळांचा निरोप घेऊन आला आहे. प्राण गेला तरी बेहत्तर, तुरुंगात जावं लागलं तरी हरकत नाही; पण दर मिळाल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही अशी प्रत्येक शेतकऱ्यानं शपथ घेतली आहे !

'आज शेतकऱ्यांची तरुण मुलं इथं हातामध्ये झेंडे लावलेल्या लाठ्या घेऊन आली आहेत. आपल्याला झेंड्याची आवश्यकता आहे; पण लाठ्या-काठ्यांची, दगड-धोंड्यांची अजिबात गरज नाही ! आपली ताकद संघटनेमध्ये आहे. आपली ताकद संख्येमध्ये आहे. आपली ताकद शांततापूर्ण सत्याग्रहात आहे !

¤

**—आंदोलननगराजवळील माळावर ५ एप्रिल १९८१च्या संध्याकाळी भरलेली सभा विसर्जन पावली तेव्हा अकोळच्या २२ वर्षे वयाच्या, बीकॉम शिकत असलेल्या आणि नुकतंच लग्न झालेल्या महादेव भिमराव तावडे ह्या शेतमजुराला, ममदापूरच्या दिनकर दाजी चव्हाण ह्या पंचेचाळीस वर्षांच्या शेतकऱ्याला, चिखलहाळ गावच्या, नुकतंच लग्न झालेल्या आबा आण्णा इंगळेला, गळदग्याच्या भाऊसाहेब आणि गोविंद ह्या कोंडेकर बंधूंना, भोजच्या ज्योती देवू गावडे ह्या तरुण शेतमजुराला, नांगनूरच्या ज्ञानदेव भल्लू पाटील आणि कृष्णा दादू पाटील ह्या शेतकऱ्यांना, रामपूरच्या ज्ञानू सुबराव सूर्यवंशी यांना आणि लिंगनूरचे सरपंच अनंत कुऱ्हाडे ह्यांना काहीच कल्पना नव्हती की आजची आंदोलननगरीतील आपली रात्र ही शेवटची आहे !**

¤

६ एप्रिल १९८१. सुभाष जोशींचं घर. वेळ दुपारी बाराची. एस. आर. पी. च्या लाठीहल्ल्यात जबर जखमी झालेले श्री. शिंदे ह्यांच्यावर डॉ. ध्रुव मंकडनी तातडीनं प्रथमोपचार केल्यामुळं रक्तस्राव थांबला होता; पण डोक्याला झालेल्या जखमेला टाके घालणं आवश्यक होतं. डॉ. ध्रुव मंकड फोनवरून हॉस्पिटलशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होते.

बाहेर बघ्यांची गर्दी लोटली होती. अफवांना ऊत आला होता. कॉलेजच्या वयाची तरुण पोरं तोंडाला येईल ते बडबडत होती. अफवा पसरविणाऱ्यात व्यापाऱ्यांचे 'चमचे' देखील मोठ्या प्रमाणात होते. कुणी म्हणत होतं, आंदोलननगरीत प्रेतांचा खच पडलाय, ओढ्यात चार बायकांची प्रेतं तरंगताहेत, एका विहिरीत बायकांची दोन प्रेतं पडलीत, एक डी. एस. पी. आणि तीन फौजदारांचे मुडदे रस्त्यावर टोलनाक्यापाशी पडलेत, शे-दीडशे पोलीस जखमी झालेत ! प्रत्येकजण 'ऐकीव' माहिती स्वतःचा मीठमसाला लावून दुसऱ्याला सांगत होता.

अफवा ऐकून मी वैतागलो. सर्वांना हात जोडून विनंती केली की, कृपया जे पाहिलं नाहीत त्याबद्दल बोलू नका ! आणि मग हळूहळू सगळ्यांना दरवाज्यापासून दूर केलं.

आंदोलननगरात प्रत्यक्ष काय घडलंय हे पहावं म्हणून मी आणि सरोजा गळ्यात कॅमेरे अडकवून बाहेर पडलो. एका फोटोग्राफरच्या दुकानातून फिल्म-रोल्स खरेदी केले आणि रिक्षा शोधू लागलो. निपाणीतील रस्ते ओस पडले होते. पिंजऱ्याच्या गाडीतून फिरणारे


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

एस. आर. पी. आम्हा दोघांकडे कुतूहलानं पहात होते. आम्ही एस. टी. स्टँडपर्यंत पोहोचलो; पण तिथून पुढं जाता येईना. पोलिसानी रस्ता रोखून धरला होता. एकजण आमच्याजवळ येऊन म्हणाला, 'तिथं नका जाऊ मरायला, पोलीसवाले धरून बडवायला लागलेत, माघारी जा!' एकूण प्रकाराचा अंदाज लागून माझ्या मनानं कच खाल्लीच होती. आम्ही परत फिरलो.

सुभाष जोशीच्या घरी परतल्यावर मी बाहेरच्या खोलीत बसून राहिलो. डॉ. मंकड फोनशी बसून होते. गोपीनाथ धारियांचा पत्ता नव्हता. त्यांच्या घरी फोन करूनदेखील त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता.

दीड-दोनच्या सुमारास वृत्तपत्रांची वार्ताहरमंडळी आणि छायाचित्रकार आले. निपाणीतील एका तरुण छायाचित्रकाराला पोलिसानी बुटांनी तुडवून काढला होता– तो तक्रार देण्यासाठी आला होता. दुपारी वृत्तपत्रांचे छायाचित्रकार कोल्हापूरला जाण्यासाठी निघाले– वाटेत ते आंदोलननगरीचे फोटो घेणार होते. माझ्या बायकोला त्यांच्याबरोबर जायचं होतं; पण माझ्या मनानं पुन्हा कच खाल्ली– मी तिला जाऊ नको म्हणून सांगितलं. आज का कुणास ठाऊक मन कच खात होतं!

संध्याकाळी सर्वत्र सामसूम आणि भयाण शांतता! सदैव गजबजलेल्या सुभाष जोशीच्या घरावर एक विचित्र अवकळा पसरली होती, सुनीताअक्का स्वयंपाकघराच्या दाराशी न बोलता बसलेली– ध्रुव मंकड फोनशेजारी, मी, सरोजा आणि संध्या एका चटईवर भिंतीला टेकून गप्प! कुणी कुणाशी बोलत नव्हतं. कोण काय विचार करत असेल कुणास ठाऊक! माझं मस्तक मात्र बधिर झालं होतं. भकास!

रात्री अडीच-तीन वाजता बाहेरच्या दरवाजाची कडी खटखटली. गोपीनाथ धारिया, शामराव देसाई आणि शंकर वाघ कोल्हापूरहून आले होते. शंकर वाघ निपाणीत थांबणार होते, बेल्लारीला तुरुंगात शरद जोशींची गाठ घ्यायला जाणार होते आणि गोपीनाथ धारिया महाराष्ट्राच्या हद्दीत पांगीऱ्याला उपोषणाला बसणार होते. सकाळी पाचच्या सुमारास मी आणि सरोजानं धारिया आणि देसाईंच्या बरोबर निपाणी सोडलं. गाडी पांगीऱ्याला पोहचेपर्यंत मी अतिशय अस्वस्थ होतो. आयुष्यात प्रथमच कधी नव्हे ती सूक्ष्म अशी अनामिक भीती मनात उमटत होती.

भाई धारिया पांगीऱ्याला उपोषणाला बसले. त्यांच्या ड्रायव्हरनं आम्हाला कोल्हापूरला सोडलं. एस. टी. पकडून आम्ही पुणं गाठलं. घरी पोहचताच मी माझ्या धाकट्या भावाला फोन केला,

''हॅलो, कोण दिलीप काय– हो, आत्ताच आलो... मग सांगतो सगळं, हे बघ मी फोन अशासाठी केला, मला शंभर रुपये हवे आहेत... हो घेऊन ये आणि येताना एक व्हिस्कीची बाटली पण आण!...'

## समाप्त

## अवतीभवती : पृष्ठ १० वरून

ज्याला या विषयामध्ये रुची आहे अशा मंडळींना प्रशिक्षण देऊन तयार करणे तेवढे अवघड नाही. सुयोग्य मार्गदर्शन नसल्याने अनेक मंडळींना इच्छा असूनही या व्यवसायाकडे येता येत नाही. आज सुदैवाने काही मातब्बर जादूगार आपल्या संचासह प्रयोग करत असल्याने या शिकाऊ मंडळींना भरती होता येते; पण अनेक वर्षे उमेदवारी करूनही म्हणावा तसा वाव मात्र मिळत नाही.

विविध राज्यांतून जो करमणूक-कर आकारला जातो त्याबाबतही त्यांनी कठोर टीका केली. ते म्हणाले, या कर-धोरणाबाबत सुसूत्रता नाही. एके काळी राजस्थानमध्ये अजिबात कर नव्हता. आज त्याच राजस्थानमध्ये शंभर रुपयांचे उत्पन्न झाले तर पन्नास रुपये करापोटी भरावे लागतात! श्री. सरकार तंबूमध्ये आपले खेळ करत असल्याने मी त्यांना पावसाळ्यात पुण्यास येण्याबाबत प्रश्न विचारले. तेव्हा ते म्हणाले, पावसाळा अडचणीचा खरा; परंतु पाऊस आहे म्हणून खेळ बंद ठेवून कसे चालेल? उत्पन्न कमी-जास्त होते इतकेच; पण खेळ करावेच लागतात. आता एक गोष्ट निश्चित की, जिथे अतिशय पाऊस असतो अशा भागात आम्ही पावसाळ्यात कधीच जात नाही. पुण्याला तुलनेने पाऊस कमी म्हटल्यावर महिना-दीड महिना येथे मुक्काम करून पुढे जाता येईल अशा हिशेबानेच आम्ही येथे आलो.

जादूगारांच्या प्रयोगात असतात ते सर्व प्रमुख प्रकार सरकार यांच्या प्रयोगातही आहेत. त्यांचे चिरंजीव त्यांच्या बरोबरीने उभे रहात असल्याने त्यांना ताण पडत नाही आणि मुलगाही या कलेत आता चांगलाच वाकबगार झाला आहे. पेटीमध्ये तरुणी बंद करून क्षणार्धात तिला बाहेर काढणे आणि तिच्या जागी पुरुष बंदिस्त करून दाखवणे, छोट्या मुलीला अधांतरी तरंगत ठेवणे, एका रंगीत रुमालावर मोठा गोलक लीलया नाचवणे यासारखे अनेक प्रयोग सरकार सफाईने सादर करतात. कार्यक्रमाची गतीही चांगली असून अडीच तासांचा भरगच्च कार्यक्रम ते प्रेक्षकांना देऊन त्यांनी खर्च केलेल्या पैशाचा पुरेपूर मोबदला ते त्यांना देतात. आपल्या कारकीर्दीमधील काही वैशिष्ट्यपूर्ण अनुभव सांगण्याची त्यांना विनंती केली असता ते म्हणाले : १९७१ साली आम्ही आग्रा येथे प्रयोग करत होतो. तुफान गर्दीत प्रयोग चालू होते. आमचे प्रयोग ज्या किल्ला मैदानावर चालू होते तेथेच पंतप्रधान इंदिरा गांधी यांची सभा होती; परंतु आमच्या प्रयोगाला गर्दी इतकी अफाट होती की तेथे सभा घेणे शक्यच नव्हते. लोकानीही सभा दुसऱ्या गावी घ्या, अशी विनंती केली आणि पोलीस अधिकाऱ्यांना ती मानावी लागली. याउलट, गर्दीअभावी अगदी थोड्या लोकांसमोरही खेळ करावे लागतात; पण आम्ही कसूर करत नाही. मग प्रेक्षकच आमची जाहिरात करतात आणि जादूची ही दुनिया चालू राहते. □

पुस्तके

# एक परिपूर्ण आलेख

## श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र

मराठीत नाव घेण्याजोगी दहा-बारा तरी वाङ्मयसेवक दांपत्ये दाखवता येतील. गोविंद वासुदेव कानिटकर (१८५४ ते १९१८) आणि काशीबाई कानिटकर (१८६१ ते १९४८) हे त्यातलेच एक दांपत्य. '*महाराष्ट्रातील एक स्पृहणीय जोडी*' या शब्दात 'नवयुग'च्या संपादकांनी त्याचे वर्णन केलेले होते (जुलै १९१८). गोविंदराव हे इंग्रजी शिक्षण घेतलेले एक बुद्धिमान आणि कलाप्रेमी गृहस्थ होते. न्याय खात्यातली सरकारी नोकरी सांभाळून त्यांनी वाङ्मयाचा बराच व्यासंग केला आणि त्यात भरही टाकली. 'नारायणराव पेशवे यांचा वध', 'अकबरबादशहा', 'संमोहलहरी' यासारखी त्यांची काव्ये, रवींद्रनाथ टागोराच्या 'गीतांजली'चे त्यांनी केलेले गद्य रूपांतर आणि जॉन स्टुअर्ट मिलच्या '*Subjection of Women*' या ग्रंथाचे त्यांनी केलेले भाषांतर ('स्त्रियांची परवशता') विशेष प्रसिद्ध आहे. १९०६ मध्ये पुण्याच्या मळेकर वाड्यातील ज्या संमेलनात महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना झाली, त्या ग्रंथकार संमेलनाचे ते अध्यक्ष होते. साहित्याप्रमाणेच संगीत, चित्रकला यासारख्या कलांमध्येही गोविंदरावांना रस होता. अशा गोविंदरावांच्या काशीबाई या पत्नी. गोविंदरावांच्या मानाने दिसायला सामान्य. तेव्हाच्या स्त्रियांप्रमाणेच अशिक्षित. 'कानिटकरांच्या घरी मी निर्बुद्ध आले', असे काशीबाई म्हणतात! अशा स्थितीत, स्त्री-दास्याच्या त्या काळात आपल्या सुशिक्षित-सुधारक पतीच्या सहवासाने काशीबाईंनी जी अक्षरयात्रा केली ती डोळे दिपवून टाकणारी आहे. मराठीतल्या आद्य कादंबरी-लेखिका म्हणून त्या ओळखल्या जातात! 'रंगराव', 'पालखीचा गोंडा' यासारख्या कादंबऱ्या, 'चांदण्यातील गप्पा' हा कथासंग्रह आणि विशेषतः डॉ. आनंदीबाई जोशीचे त्यांनी लिहिलेले चरित्र विशेष प्रसिद्ध आहे. याशिवाय 'मनोरंजन', 'नवयुग', 'विविध ज्ञानविस्तार' यासारख्या नियतकालिकांतून त्यांनी विपुल स्फुटलेखन केले. त्यांच्या लेखनाला कृतिशीलतेची जोड होती. विविध प्रकारचे सामाजिक कार्य, काँग्रेसचे राजकीय कार्य, थिऑसॉफीची उदार धार्मिक चळवळ यात त्यांचा सहभाग होता.

*अशा या* '*स्पृहणीय जोडी*'*च्या जीवन*-कार्याचा अत्यंत सुंदर आणि परिपूर्ण आलेख प्रा. सरोजिनी वैद्य यांनी मराठी वाचकांपुढे 'श्रीमती काशीबाई कानिटकर : आत्मचरित्र आणि चरित्र' या पुस्तकाद्वारे मांडलेला आहे. एका जुन्या वाङ्मयसेवक दांपत्याविषयीचा हा आलेख काढण्याचे काम सांप्रतच्या एका वाङ्मयसेवक दांपत्यातील सरोजिनीबाईंनी करावे हा एक अर्थपूर्ण योगायोग म्हणायला हवा! चार गोष्टी एकत्र करून पुस्तकात कशा तरी कोंबणे या स्वरूपाचे उथळ संपादन हल्ली बऱ्याच वेळा पहायला मिळते; पण सरोजिनीबाईंचे या पुस्तकाचे संपादन मात्र आदर्श म्हणावे लागेल. हरिभाऊ आपट्यावरील काशीबाईंचा जुना लेख वाचून संपादिका प्रभावित झाली आणि नंतर काशीबाईंच्या लेखनाचा वेध आणि व्यक्तिमत्त्वाचा शोध ती घेऊ लागली. पुढे काशीबाईंचे अप्रकाशित आत्मचरित्र तिच्या हातात पडले. ह्या आत्मचरित्राला आवश्यक त्या टीपा, तळटीपा आणि परिशिष्टांची जोड तर संपादिकेने दिलेलीच आहे; पण ह्या अपुऱ्या आत्मचरित्राला 'उत्तरायणा'ची जोड देऊन पूर्णत्व प्राप्त करून दिले आहे. आत्मचरित्राला दिलेली ही चरित्राची जोड अनावश्यक बाडगुळाप्रमाणे असह्य होत नाही; उलट मूळ चित्राला अधिक उठाव देते.

काशीबाईंचे आत्मचरित्र म्हणजे काही केवळ त्यांच्या आयुष्यातल्या घटनांची सविस्तर जंत्री नाही. इथे एका संवेदनाशील स्त्रीने आपल्या आयुष्याची कहाणी सांगताना त्या वेळच्या समाजस्थितीचेही काही प्रमाणात चित्रण केलेले आहे. संपादिकेने म्हटल्याप्रमाणे, '*आत्मचरित्राचा लेखनकाळ* सर्वसाधारणपणे १९२१ ते १९४७ असा मानावा लागेल. वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये झालेल्या या लेखनात इतिहास आला आहे तो मात्र पेशवाई अखेरपासून स्वातंत्र्योदयापर्यंतचा!' साहजिकच या आत्मचरित्राला इतिहासाच्या दृष्टीनेही काही एक मोल प्राप्त झालेले आहे. हे मोल लक्षात घेता या पुस्तकात सूची आवश्यक होती; पण ती एक उणीव मात्र राहिलेली आहे. १८५७ नंतरचे वातावरण, ग्रामण्याचा धुमाकूळ, गर्दभानंदाची मिरवणूक, सुधारकाची प्रेतयात्रा, रँड-वध, थिऑसॉफीची चळवळ, सेवासदनाची स्थापना व कार्य अशा घटनांविषयीची माहिती या आत्मचरित्रात ठिकठिकाणी येऊन जाते. तसेच न्यायमूर्ती रानडे व रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, गोपाळराव व आनंदीबाई जोशी, हरिभाऊ आपटे, साईबाबा इत्यादी समकालीन *व्यक्तिमत्त्वा*-वरही काशीबाईंनी प्रकाश टाकलेला आहे. मूळ आत्मचरित्रात नसलेले पण संपादिकेने योजकतेने समाविष्ट केलेले हरिभाऊ आपटे आणि रमाबाई रानड्यावरचे काशीबाईंचे लेखही प्रत्ययकारी उतरलेले आहेत. त्या वेळची स्त्रियांची स्थिती *काशीबाईंनी* प्रभावीपणे रंगवलेली आहे. उदाहरणार्थ, काशीबाई म्हणतात,

'आम्हा मुलींना बसण्यास केव्हाही पाट नसत. जमीन ओली असली तरच पाट; पण आमच्याच बरोबरीचे मुलगे पाटाशिवाय बसत नसत. चुकून पाट मांडावयाचा राहिला तर तो एखाद्या मुलीने आणून दिला पाहिजे! दोन प्रहरचो जेवणे वडिलांच्या पंगतीबरोबर होत. तरीदेखील आम्हा मुलींची पंगत बिनपाटाचीच असे. याचे कारण असे सांगण्यात येई की, सासरी गेल्यावर, पाटावर बसण्याची सवय झाली असली तर जड जाईल... या-

संबंधाने आम्हास काही वाटत नसे. आम्ही मुलीच्या जन्माला आलो असल्यामुळे आम्ही कमी प्रतीच्या हे देवांनीच ठरवले आहे, अशी आमची समजूत झालेली असे. त्या समजुतीचा फायदा एवढाच होता की, श्रेष्ठ कनिष्ठ ही भावना मनात येऊन कधी मत्सर वाटत नसे. आपण कमनशिबी एवढेच वाटे'(पृ. १८).

'आम्हा मुलींचे शिक्षण म्हणजे रोज थोडथोडी डाळ–तांदूळ निवडणे, भाजी निवडून बारीक चिरावयास शिकणे, एखादी कोशिंबीर किंवा चटणी करणे व ते जिन्नस व्यवस्थितपणे वाढावयास शिकणे. एकमेकींच्या वेण्या घालण्याची सवय करणे, आपली ताटवाटी, पाणी पिण्याची लोटी व पातेली स्वच्छ ठेवणे; आपली साडी-अंथरूण व्यवस्थित राखणे व स्तोत्रे पाठ करणे, नमस्कार घालणे वगैरे. त्या काळी लिहिण्या–वाचण्याचे शिक्षण देण्याची वहिवाट नव्हती.'(पृ. २०).

'बायकांना शिकविले म्हणजे' लोक आनंदीबाई पेशव्यांचे उदाहरण देत. राघोबादादाची आनंदीबाई लिहिण्या–वाचण्यात फार हुशार होती. तिने राघोबादादाच्या चिठ्ठीत नारायणरावासंबंधी धरणे असे होते त्यात डोळ्यातील काजळ काढून 'धरावे'चे 'मारावे' केले ही गोष्ट सर्वश्रुत आहेच व आमच्या मुलींच्या शिक्षणास तेच उदाहरण आडवे येई.' (पृष्ठ २२). 'बायकांनी शुद्ध बोलणेसुद्धा लोकांना आवडायचे नाही. माझ्या सासूबाई शास्त्र्यांची मुलगी होती. तिनेसुद्धा शुद्ध बोलता कामा नये. त्यांनी मुंबईस 'ममई' असे म्हणावयाचे. 'पुन्हा' असे न म्हणता 'मातक्यान' म्हणावयाचे अशासारखी घरातली पध्दत असे (पृ. ७५). 'परमेश्वराची एक मोठी कृपा आहे म्हणावयाची की बायकांच्या मेंदूची रचना त्याने असे आघात सोसण्यायोग्य केली आहे!' (पृ. १३१).

## 'हॅपी कपल्' मधला आंतरिक दुरावा

स्त्रियांच्याच नव्हे तर एकूणच समाजस्थितीचे प्रतिबिंब या आत्मचरित्रात पडलेले दिसते. त्या वेळचे सनातनी वातावरण, समाजात होऊ लागलेले बदल, त्यातून घडणारे वाद आणि विनोद (उदा. ग्रामण्याचा वाद– पृ. ९४ ते १०३, घडयाळाला 'नवा देव' समजणाऱ्या अडाणी स्वयंपाकिणीचा किस्सा- पृ. ४० ते ४३, पाहुण्यांच्या स्वयंपाक्याकडून 'चहाचं पक्वान्न' शिकण्याचा किस्सा-पृ ६५) हे सारे आपल्या सहजसुंदर शैलीत काशीबाई रंगवतात. त्यांनी स्वतःच्या लग्नाचे जे वर्णन केले आहे ते मुळातून वाचण्यासारखे आहे. त्यामध्ये पंढरपूरच्या बडव्यांची दादागिरी आणि चोरटेपणा तेव्हाही कसा होता हेही मोठे बघण्यासारखे आहे! (पृ. २६ व २९). 'त्या वेळी कारकुनाची परीक्षा अक्षरावरच होत असे' (पृ. ३८), किंवा 'त्या वेळी प्रिव्हियसला लिटल गो म्हणत' (पृ. ६८), अशा एकेका वाक्यातूनदेखील 'त्या' वेळचे वातावरण उभे रहाते.

व्यक्तिगत जीवनातले चढ-उतार, सनातनी कुटुंबीय मंडळी आणि सुधारकी पती यांच्यामुळे कात्रीत सापडल्यासारखी होणारी स्वतःची अवस्था, विविध व्यक्तींशी दृढ होत गेलेले स्नेहसंबंध, साहित्यलेखनाच्या प्रेरणा आणि साहित्यविषयक चर्चा–हे सगळे अतिशय उत्कटतेने काशीबाई रंगवतात. ह्या सर्व कथनात पाल्हाळाचा दोष अगदीच नाही असे नाही; पण सर्वसाधारणपणे हे कथन रंजक आणि उद्बोधक झालेले आहे, असेच म्हटले पाहिजे. काशीबाईंच्या प्रभावी शैलीचे एक बोलके उदाहरण असे–काशीबाईंचे लेखन-वाचन घरातल्या मंडळींना पसंत नसे. त्यावरून त्यांना नेहमी टोमणे मारले जात. अशा वेळी काशीबाईंना काय वाटत असे? त्या म्हणतात, '...सर्व पंक्तीत त्यांचे हे बोलणे ऐकले की, मातीचे ढेकूळ जसे पाण्यात विरघळावे तशी माझी स्थिती होई.' (पृ. ७९).

ह्या आत्मचरित्रात गोविंदरावांच्या सेवानिवृत्तिनंतरच्या काळातली (१९०९ ते ४८) फारच थोडी जीवनकथा आलेली आहे; पण काशीबाईंच्या जीवनाच्या उत्तरायणाचा हा काळ अतिशय महत्त्वपूर्ण आहे. 'या काळातील सन्मानाच्या आणि सांत्वनाच्या अनेक प्रसंगांमध्ये काशीबाईंच्या जीवनकथेला जे सामाजिक परिमाण लाभते ते सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने मला फार महत्त्वाचे वाटले', असे संपादिका म्हणते. तसेच हरिभाऊ आपटे ज्याला 'हॅपी कपल्' म्हणत त्या गोविंदराव-काशीबाईंचे आयुष्य या काळात बदलत गेले. या दोघांच्यात विविध कारणांमुळे एक प्रकारचा दुरावा निर्माण झाला. 'उत्तरायणा'त काशीबाईंनी न रेखाटलेली त्यांच्या जीवनानुभवांची चित्रमालिका तर सरोजिनीबाईंनी रंगवलेली आहेच; पण अत्यंत संयतपणे 'हॅपी कपल्'-मधल्या आंतरिक दुराव्याचा हृदयस्पर्शी वेधही त्यांनी घेतलेला आहे. तसेच चरित्राचा तोल बिघडू नये अशा बेताने कानिटकर दांपत्याच्या साहित्याची थोडी-फार समीक्षाही केलेली आहे.

गोविंदराव विरुद्ध घरातील इतर सर्व–हा जो एक दुभंगलेपणा त्यांच्या घराला आला तो मुख्यतः दोन कारणांनी. पहिले तात्त्विक स्वरूपाचे होते. काशीताई आणि त्यांचे थोरले चिरंजीव माधवराव हे थिऑसॉफीवाले होते, तर गोविंदराव थिऑसॉफीचे कट्टर विरोधक होते. दुसरे कारण व्यावहारिक जीवनातले होते. नवे घर बांधणे गोविंदरावांना पसंत नव्हते, तर इतरांना ते हवे होते. गोविंदरावांचा हट्टीपणा इतका की, ते नव्या घरात राहायला न जाता एकटेच जुन्या घरात राहिले! ह्या अशा दुराव्याचे नुसते ढोबळ वर्णन न करता सरोजिनीबाईंनी त्याची सखोल चिकित्सा केलीय. उदाहरणार्थ, त्या म्हणतात, 'गंमतीची गोष्ट अशी होती की, एकीकडे आपल्या बायकोस स्व-मत तयार करण्याची शक्ती आपण दिली याचा गोविंदरावाना अभिमान वाटे आणि दुसरीकडे तिने आपल्याच सर्व मतांना 'हो' म्हणावे अशीही त्यांची आंतरिक अपेक्षा असे.' (पृ. २१९-२०). 'असे दिसते की, सुधारक, व्यक्तिस्वातंत्र्यवादी गोविंदरावाची स्त्री-स्वातंत्र्याची वैचारिक जाणीव प्रत्यक्ष दैनंदिन आयुष्यात पती म्हणून, पिता म्हणून त्या स्वातंत्र्याला पेलताना सुखाऐवजी बऱ्याच वेळा आपल्या अवमानाचे दु:खच मानून घेत होती. ते मतस्वातंत्र्य देत होते; पण ते त्यांना सुखाने पेलणे जड जात होते.' (पृ. २२४). विसंगतीच्या कात्रीत अडकलेल्या गोविंदरावाची ही स्थिती रंगवत असतानाच संपादिका काशीबाईंच्या मानसिक अवस्थेवरही प्रकाश टाकते–'...ही अवस्था पेलणे काशीबाईंना दुसऱ्या एका कारणानेही जड गेले. सामाजिक क्षेत्रात त्यांची जी प्रतिमा निर्माण होऊ नये असे त्यांना वाटत असे तीच प्रतिमा नेमकी या घटनेतून निर्माण होऊ लागली.

बायका शिकल्या म्हणजे त्या पेशवाईतील आनंदीबाईप्रमाणेच 'ध' चा 'मा' करतील असे जसे जुन्या लोकांना वाटत असे, तसे नव्या काळातील लोकांना त्या कुटुंब-सुखाबद्दल बेजबाबदार आणि पारंपारिक मूल्याबद्दल, संस्कृतीबद्दल उदासीन होतील असे वाटे. आपल्या संबंधात समाजाला असे वाटू नये, याची जास्तीत जास्त काळजी काशीबाई घेत असत. त्यांनी आपली राहणी, वाणी, करणी अत्यंत चोखपणाने नीटनेटकी ठेवल्यामुळे, प्रत्येक स्त्री-सुधारणाविषयक चळवळीकडे डोळ्यात तेल घालून बघणाऱ्या 'केसरी'नेसुद्धा त्याचा गौरव वरचेवर केला होता...त्यामुळे गोविंदरावाच्या नव्या घरासंबंधीच्या *या वागण्याने, जे आपण आयुष्यभर* सांभाळले तेच गमावले जाते आहे याचे दुःख काशीबाईंना फार झाले.' (पृ. २२५).

चरित्रलेखनात चरित्रनायकाची वा नायिकेची अवास्तव व्यक्तिपूजा होण्याचा धोका असतो; पण सरोजिनीबाईंनी बऱ्याचशा वस्तुनिष्ठपणे (पण तरीही सहृदयतेने) *'उत्तरायण' लिहिलेले आहे. काशीबाईंच्या* साहित्याची त्यांनी केलेली मीमांसा (पृ. २३२ ते ४२) या वस्तुनिष्ठतेचा प्रत्यय आणून देते. काशीबाईंच्या साहित्याचे गुण आणि वैशिष्टये टिपताना, काशीबाईंच्या कथा-कादंबऱ्यांचे 'हे सुखद शेवट, कलादृष्टया विलक्षण दुःखदच असतात,' असा शेरा *मारायलाही त्या कचरत नाहीत !*

**चरित्र-आत्मचरित्राचा सुंदर मिलाफ**

काशीबाईंचे *'अपेक्षेहून अधिक काळ* रेंगाळलेले' म्हातारपण लेखिकेने प्रभावीपणे चित्रित केले आहे. तेव्हाचे काशीबाईंचे आयुष्य कसे होते ? तर– 'नाटकाचे सगळे अंक केव्हाच संपून गेले होते, तरी पडदा मात्र पडत नव्हता. प्रेक्षागृहात कुठे तरी तुरळक बसलेल्या दोन-चार माणसांनी त्याचे रिकामपणच अधिक ध्यानात आणून द्यावे, तसे रिकामे दिवस ! रिकामे आयुष्य...' (पृ. २५४). पण तरीही असंख्य दुःखे पचवणाऱ्या काशीताईंची वृत्ती किती आदर्श असावी ?– 'सभोवतालच्या बदललेल्या कुटुंबजीवनात, समाजजीवनात, स्वतःच्या *अस्तित्वाचा लागलेला कटू संदर्भ,* कळूनही त्यांना दुःखद वाटत नव्हता. 'साहजिकच आहे' *या एका अर्थाशी त्या समाधानाने गुंतून* राहू पाहात होत्या.' (पृ. २५५).

*काशीबाईंच्या आत्मचरित्राला सरोजिनी*बाईंनी दिलेली ही चरित्राची जोड अतिशय पूरक ठरलेली आहे. संपादित आत्मचरित्र आणि पूरक चरित्र यांच्या मिलाफातून एक अभिनव प्रयोग सरोजिनीबाईंनी साधलेला आहे. एक परिपूर्ण आलेख त्यातून साकार होतो, हे त्याच्या यशस्वितेचे गमक आहे.

*शेवटी आणखी एका गोष्टीकडे लक्ष* वेधणे मला आवश्यक वाटते. हा साहित्यिक *प्रयोग निव्वळ कलावादी* भूमिकेतून साकार झालेला नाही; तर ह्या पुस्तकाचा बोधवादाशीही पुरेपूर संबंध आहे. (हा बोधवाद काशीताईंच्या साहित्याच्या मुळाशी नक्कीच होता.) वेगळ्या जीवनदृष्टीशी, स्त्री-मुक्तीशी आणि साहित्याच्या जीवनसन्मुखतेशी ह्या पुस्तकाच्या निर्मितीचा काहीएक संबंध आहे हे निश्चित. आपल्या प्रास्ताविकात सरोजिनीबाई म्हणतात, 'आपली परंपरा आणि आजचे जीवन या संबंधात थोडेसे वेगळे भान काशीताई कानिटकरांच्या चरित्राने वाचकांच्या मनात निर्माण केले आणि मराठी साहित्य अधिकाधिक जीवनसन्मुख होण्यास ते प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने साह्यभूत झाले तर अर्थातच मला समाधान वाटणार आहे. त्या अपेक्षेनेच मी संपादनाचा आणि लेखनाचा हा प्रपंच केलेला आहे.' काशीबाईंच्या *आत्मचरित्रावर सुरुवातीला* फ्रेडरिक हॅरिसन यांचे मिलच्या 'Subjection of Women'च्या संदर्भातले एक विधान दिलेले आहे ते असे–

'Sooner or later, I am sure, if you begin by educating women, you must end by emancipating them. It is the emancipation, not the mere education that most appeals to me'

ह्या भूमिकेवर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक वाचकाने ती भूमिका समजावून घेतल्याशिवाय त्याचे या पुस्तकाचे आकलन पूर्ण होऊ शकणार नाही, हे नक्की !

–राजा दीक्षित

श्रीमती काशीबाई कानिटकर : आत्मचरित्र आणि चरित्र (१८६१–१९४८)'
संपादन आणि लेखन : सरोजिनी वैद्य
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे : ३०५, मूल्य : ३० रु.

फिनिक्स निवड

# Poona Company

By Farrukh Dhondy
Short Stories
Victor Gollancz Ltd.
Pages 149,
£ 4 95 about Rs. 95/—

'East is east; the west is west; and never the twain shall meet.' *'दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी'*. एकीकडे पुण्यातील लष्कर आणि दुसरीकडे पुण्यातील पेठा, मारुती, भांबुर्डा, एरंडवणा, गावठाण वगैरेचा विचार केला की मला रुडयार्ड किपलिंगचे वरील वाक्य वारंवार आठवते. क्वचितच एक शहर एवढं दुभंगलं असेल. क्वचितच एका शहराला असा *स्कीझोफ्रेनिया (literal) झाला* असेल. *स्कीझोफ्रेनिया* म्हणजे दुभंगणे. अशा परिस्थितीत लष्कर भागाचे नाव poona च ठेवायचे होते. खरं म्हणजे सांगली–मिरज, धारवाड–हुबळी, हैद्राबाद–सिकंदराबाद, अशीच Poona–Pune दोन वेगळी शहरं करायला हवी होती. आतापर्यंत फक्त सिनेमा थिएटरांपुरतं 'इंटेग्रेशन' या दोन भागात झालं आहे. 'अलका'त इंग्रजी सिनेमा लागला की केव्हा *एकदा या गर्दीच्या शहरातून लष्करकडे जाऊ* असे या लोकांना होत असते. या पुस्तकातील वर्णने लष्कर भागातील आहेत.

अलका टॉकीज. लकडी पूल. संध्याकाळी ६ ते ८॥–९ ची वेळ. संध्याकाळचे पुणे. दुसरी बाजू. या वेळेत या पुलावर वाहनाची इतकी गर्दी व इतकी बेशिस्त असते की मी *ग्रंथालयात पायीच येतो. या वेळेला* पुलावर ध्वनिप्रदूषणाचा व बेशिस्तपणाचा कळस कधीकधी बुलेटसारखा तुम्हाला हीट होतो. ध्वनिप्रदूषणाचा संसर्ग जणू वरच्या पोस्टसंना पण लागतो. ट्राफिक सिग्नल हिरवे होतात. सर्व वाहने एक होऊन गियर्स बदलतात जो तो आधी घुसायला बघतो. वाहनांच्या एंजिनाचा क्रिशेण्डो (crescendo) वाढत वाढत कोणत्या डेसीबेलला पोहोचतो ! एक्सीलरेटर

वाढवत जातानाच हॉर्न वाजवला की कसा जोरात अवरोह होतो, 'टे एंएए...' सोबत एंजिनचं डेसीबेलही चढतं. माना वळतात. हिरोसारखे वाटते! उत्तरोत्तर प्रगतीकडे. संसर्ग लागलेले पोस्टर्स किंचाळतात, 'मला वापरा, माझा वापर करा. तुम्ही अधिक सुखी व्हाल!'

मी ग्रंथालयातील काम आटपून परत फिरतो. एखाद्या दिवशी थोडा लवकर. रात्रीचे साडेआठ वाजलेले असतात. सोडियम व्हेपरमध्ये लकडी पूल न्हाऊन निघतो. पुण्याची शान वाढली असा मनात विचार येतो. ट्राफिक सिग्नलसाठी—जिमखान्याकडून शहराकडे जाण्यासाठी—वाहने दबा धरून बसलेली असतात. कुठे बजाजचं पॉवरफूल, क्लिअर, आटोपशीर आवाजाचं मशीन, कुठे ल्यूना टी एफ आरची घरघर, कुठे काही इतर अनेक मोपेडचे दुबळे कफ, रीश्टर स्केलवर बसेस व ट्रक्स, येझदीचे लयबद्ध तांडव नृत्य, कोपरं बाहेर असलेल्या फियाट, ॲम्बॅसॅडर असा काफिला उभा होता. एका हिरव्या फियाट गाडीच्या अलीकडे मोटार—सायकलीवरील एक दाम्पत्य व दुसऱ्या बाजूला पांढऱ्या दगडांजवळ एक स्कूटरस्वार. मी पूल ओलांडायला सुरुवात केली व या तिघामध्ये जोरात वाद चाललेला पाहिला. मोटारसायकलीवरील पुरुषानी फियाट-वाल्याला चौकीवर चलायला सांगितले. पांढऱ्या दगडाजवळील स्कूटरस्वारानी त्याला पडसाद दिला. यावरून फियाट—ड्रायव्हर मध्येच जोरात घुसला असावा असे मला वाटले. सिग्नल हिरवा झाला. लोंढा निःश्वास सोडून एकदम जीव आल्यागत सरकायला लागला. जणू त्याला आज या ट्रॅफिक सिग्नलचे एकच दुःख होते. फियाटवाल्यांनी मुद्दाम गाडी एकदम मोटारसायकलीवरील दांपत्याकडे वळवली. मोटारसायकलचे हॅंडल फियाटच्या दार उघडण्याच्या हॅंडलजवळ किंवा खिडकीच्या चढावावर अडकलं. ड्रायव्हरने बुद्धयाच एकदम वेग वाढविल्यामुळे त्याला काहीच करता येईना. मोटारसायकलवरील ते दांपत्य फरपटत जायला लागलं. पुरुष एका हाताने मोटारीवर बुक्के मारायला लागला. फियाटचा वेग आणखीनच वाढला! शेवटी व्हायचे तेच झाले. फार वाईट रीतीने दांपत्य कोसळले. पुष्कळ मुका मार बसला. सुदैवाने दोन जीव वाचले. शॉक बसलेल्या बायकोची नवरा समजूत घालू लागला. भर रस्त्यात कुरवाळू लागला. पोलीस चौकी वीस-पंचवीस फुटांवरच होती. मोटारसायकलचं ड्युअल सीट निखळलं. बघे जमा झाले. त्यातला एक तरुण बोलून उठला, 'फियाटवाल्याची साली काय ड्रायव्हिंग स्कील!' एक म्हातारा हळहळून उठला, 'न्यायाची बाजू त्याच्याकडे होती. त्याला न्याय पाहिजे होता म्हणून असे घडले.' मी मनातल्या मनात म्हटलं, 'हि क्लॉकवर्क ऑरेंजची चाहूल.' मला काही तरुण लोकांचे डोळे लाल दिसू लागतात. ती खुन्नस असते की सोडियम व्हेपरचा इफेक्ट? भलताच खिन्न झालो. डोकं आणखीच झुकलं. उद्या आणखीनच प्रतिबिंबित व्हायचं होतं! परवा परत इंटरॲक्शन व्हायचं होतं.

पण पुण्याची दुसरीही बाजू आहे. 'पुणे तिथे काही न उणे' ही म्हण सार्थकी ठरणारीच आहे. पुण्यातील सर्व गोष्टी अगदी छानच आहेत हे विद्येचे माहेरघर असल्याने अनेक प्रकारची विद्या मिळतेच आणि पेशवेकालीन पुणे ते आज १९८१ सालातील पुण्यापर्यंत पुण्याचा इतिहास पाहिला तर त्यात नवीनता, विविधता सहजच जाणवेल. असे हे पुणे नाविन्याने भरलेले, निसर्गसौंदर्याने नटलेले आहे. त्यामुळे तेथील व्यक्ती-व्यक्तीवर एक प्रकारचा पगडा दिसून येतो.

आमच्या फिनिक्स वाचनालयात फरुख घोडी ह्यांचे The Poona Company नावाचे पुस्तक आले आहे. त्यात त्यांनी पुण्याबद्दल सुरुवातीस कॅंप विभागातील वर्णन फारच चांगले केले आहे. नऊ लहान गोष्टीमधून कॅंपमधील साचापीर चौक व सरबतवाला चौक या भागातील वर्णन त्यांनी केले आहे. लेखक स्वतः पारशी आणि त्यात तो इंग्लंडमध्ये बराच राहिलेला; त्यामुळे त्याची भाषा वाचनीय वाटते. संवादात्मक लिखाण असल्याने वाचताना ते संवाद मनात ठसतात. प्रत्येक गोष्टीत एका मुद्द्यावर लक्ष केन्द्रित करून त्याचे वर्णन केले आहे, 'सॅमसन' हा एक इसम प्रेते पोहोचविण्याचे काम करणाऱ्या टोळीचा मुख्य, जो लोकांच्या मरणाचीच वाट पहात असतो; पण लेखकाच्या सहवासामुळे त्याच्या वागण्या-बोलण्यात सुधारणा होऊन तो दुसरी नोकरी करतो. तसेच बूमरॅंग, एका हत्याराची माहिती दिली आहे. भाषा सुटसुटीत, मधे मधे पारशी शब्द आल्यामुळे रुचकर झाली आहे. कॅंप हा विभाग शहरविभागापेक्षा नाविन्यपूर्ण व निराळाच राहिला आहे.

पुणे शहराबद्दल अनेक विषय घेऊन लिहिण्यासारखे आहेच आणि बऱ्याच लेखकानी ते काम केले आहे. हरवलेले ऐतिहासिक पुणे असे म्हटले पाहिजे असे पुस्तक श्री. ग. वा. बेहेरे याचे आहे. सुरुवातीस ते वर्णन पुण्यातील आहे असे वाटत नाही; पण इतिहास घडतो तो पुण्यात अशा मार्गानेच. पुण्यातील दडलेल्या गोष्टी लेखक विनोदी भाषेने उकलून सांगतो. 'संध्याकाळचे पुणे' यात कै. दि. बा. मोकाशी यानी पुण्यातील संध्याकाळच्या वातावरणाचेच नव्हे तर संधिप्रकाशासारख्या असणाऱ्या सुन्दर, नितळ अशा वातावरणाचे वर्णन केले आहे. पुण्यातील संध्याकाळ ही अशी असते. आल्हाददायक, मनप्रसन्न करणारी. अशा वेळेस पुण्यात कोठे कोठे, काय काय चालते या गोष्टीचे वर्णन त्यानी फारच सुन्दर शब्दात केले आहे.

पुणे हे पेन्शनराचे गाव, असा ग्रह बऱ्याच लोकाचा, (विशेषतः मुबईकरांचा) खास आहे. त्याला योग्य असे वर्णन 'संध्याकाळच्या पुण्यात' आहे. आपला वेळ काढण्याकरता मोकाशींनी अनेक ठिकाणे दाखविली आहेत, असे म्हटले तर फारसे चुकणार नाही. मे महिन्यातील संध्याकाळ घालवण्यासाठी बुद्धीला चालना देणारे असे ठिकाण मॅजेस्टिक गच्चीवरील गप्पा आणि वसंत व्याख्यानमाला वगैरे कार्यक्रम असतात. वृद्धाकरिता शेंडचे-शास्त्र्यांनी चालवलेला सोमवार संध्याकाळचा उपक्रम फारच उत्तम वाटतो! प्रत्येक गोष्ट पटवताना वापरलेली भाषा सोपी व सुटसुटीत आहे! सांगण्याची पद्धतही फार उत्कृष्ट आहे. 'न पाहिलेली सभा' ही मनोरंजक कथा आहे! लहान कथेतून मोठा आशय घेऊन सांगण्याची कै. मोकाशी यांची हातोटी फारच छान आहे!

श्री. ज. जोशी हे अनेक विषयांबद्दल प्रसिद्ध लेखक. 'पुणेरी' पुस्तकात त्यानी १९२५ सालचे पुणे दाखवले आहे. पुस्तकाचा विषय जुना असला तरी रुचिपालट व गतकाल आठवण्यास फारच सुंदर आहे. 'सदाशिव —'

'नारायण' मधील भिक्षुकाची तुलना त्यानी जिमखान्यावरील श्रीमंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांशी केली आहे ती योग्य वाटते. नगरवाचन मंदिराचे वर्णन त्या काळी प्रसिद्धी पावलेले मोठे वाचनालय असे होते.

पुणेकराना सर्वांचे अगत्य फार. मे महिना व सुट्टीचे दिवस पुण्याची हवा खाण्यास व अगत्य उपभोगण्यास अनेक प्रातातून पाहुणे येत असतात. 'अतिथि देवो भव' हा मंत्र पुणेकराच्या कानात कायम घुमत असतो. पुणेकरांचे खास वैशिष्टय-सायकली. पुण्याच्या छोट्या व चौरस्त्यातून सायकली कसरतीने नेणे हे पुणेकर सायकलस्वारच करू जाणोत!

चांगल्या नाटकांना दाद देणारे पुणेकर रसिकही आहेत आणि याचमुळे शुभारंभाचे प्रयोग पुण्यात करण्याची पद्धत नाटककारानी पाडली असावी.

या पुस्तकातील कॅफे नाझ, वेस्टेंड सिनेमा वगैरे सर्व परिचित वातावरण असल्यामुळे पुस्तकात आपण रमतो, पण शेवटी नाव Pune Company का दिलं नाही हेच आपल्याला खटकते. Poona अधिक सॉफिस्टिकेटेड व Chic (शिक) वाटतं नाही?

—सौ. वनिता हर्डीकर

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

# बाईसाहेब

## एक उरकलेले नाटक

'कोरड्या डोळ्याची, हळव्या मनाची; पण थोऽडीशी वस्ताद अशी— (म्हणजे नेमकी कशी तर ते आम्हालाही माहीत नाही.) बाईसाहेब' अशी जाहिरात करीत आलेले 'बाईसाहेब' हे नाटक म्हणजे याच सुमारास रंगभूमीवर रत्नाकर मतकरी लिखित–दिग्दर्शित संगीत चि. सौ. कां. चंपा गोवेकरचे सुरेख प्रिप्रोडिया लिखित गद्य जुळे; पण हे थोडे उशिरा झाले—आपलं, उशिरा सुरू झाले.

म्हणजे, जर तुम्हाला चंपा [गोवेकर् र् र् ऽऽऽ ची कथा आठवत असेल, तर त्यात चारुदत्त धुरंधरचे एका तरुणीबरोबर जमले आहे आणि मोगा आजारपणाचे नाटक करते आहे, या ठिकाणापासून नाटक सुरू होते. याउलट 'बाईसाहेब' ची सुरुवात लग्न झाल्यामुळे हताश झालेल्या सर माधवराव त्रिलोकेकरापासून होते. पुढेही काही तपशील बदललेले आहेत. उदाहरणार्थ— (१) 'चंपा गोवेकर' मध्ये चारुदत्त आणि नाथा हे मालक–नोकर कम मित्र–मित्र असतात तर 'बाईसाहेब' मध्य माधवराव आणि चंद्रकांत झावबा हे मेहुणे – (माधवरावांची पहिली आणि अर्थातच मेलेली बायको म्हणजे चंद्रकांतची बहीण.) कम मित्र–मित्र असतात. (२) 'चंगो'मध्ये तीनही मुलगे चंपाचेच असतात आणि त्यातील एकच चारुदत्तचा असतो; तर 'बाईसाहेब'मध्ये एकच मुलगा लालन आणि (अर्थातच) माधवरावाचा असतो; तर अन्य दोन मुलगे लालनने तिच्यासारख्या अन्य स्त्रियांचे साभाळायला घेतलेले असतात. (लालनचे पातिव्रत्य आणि आणि एकनिष्ठपणा सांभाळणे हे त्या दोन मुलाचे काम.)(३) 'चंगो'मध्ये शेवटी जयाचे आणि चंपाच्या एका मुलाचे लग्न होते; तर 'बाईसाहेब' मधील अमिता ही तरुणी तिचे माधवरावावरील प्रेम खोटे असल्यामुळे त्यांना सोडून जाते. तर काही तपशिलांचे छोटे–मोठे, किरकोळ बदल सोडल्यास दोन्हीचीही कथा तीच. हो, आणखी एक मोठा फरक, 'बाईसाहेब' मध्ये मूळ गुजराथी कलाकृतीचे श्रेय आधीच देऊन टाकले आहे; तर 'चंपा गोवेकर'मध्ये मतकरीनी ती झाकली मूठ तशीच ठेवून आतल्या सव्वा लाखावर स्वतःचाच छाप उमटवला आहे.

मात्र या सगळ्या बदलांमुळे नाटकाच्या तब्येतीतही बराच फरक पडला आहे. चंपा गोवेकरसाठी सपूर्ण नाटकभर पात्राच्या हालचाली, गाण्यांची योजना इत्यादीसाठी वास्तवता आणि काल्पनिकता याच्या मध्ये रेंगाळणारी, बरेचदा काल्पनिकतेकडे झुकणारी बरीचशी स्वैर आविष्कारपद्धती दिग्दर्शकाने निवडली होती. 'बाईसाहेब'मध्ये मात्र काही प्रसंगांमधील काही पात्राच्या फार्सिकल हालचाली वगळता दिग्दर्शक अरविंद जोशींनी संपूर्ण नाटक नाटकाच्या पारंपारिक दिवाणखान्याच्या नेपथ्याला साजेसे पारंपारिकच बसवले आहे. शिवाय नाटक सुरू होण्यापूर्वी 'कलावैभव सादर करीत आहे—बाईसा...' असे सांगत असतानाच 'हे नाटक विनोदी आहे' हे सांगून टाकल्यामुळे मधून मधून हसावेसे वाटले; तर प्रेक्षकाना न लाजता, न संकोचता आणि न डगमगता हसता येते.

'बाईसाहेब' मध्ये बाईसाहेबांची म्हणजे लालनची भूमिका सुधा करमरकरानी केली, आहे, शशिकात निकते सर माधवराव त्रिलोकेकर, तर प्रकाश इनामदार चंद्रकांत झावबा झाले आहेत. संपूर्ण नाटकभर वाव असलेली ही तीन पात्रे. शशिकात निकते आणि प्रकाश इनामदारांची कामे झकास झाली आहेत. (इनामदारांनी ठायी ठायी केलेल्या नकलाही सुरेख.) सुधा करमरकर मात्र कृत्रिमपणात खूप पुढे आणि त्यामुळे कामात खूप मागे पडल्या. विशेषत: बाकी दोघाच्या सहजतेमुळे त्याचे अवघडलेपण, त्यांच्या संवाद म्हणण्यातील नाटकी ठाशीवपणा या गोष्टी फारच उठून दिसल्या. फक्त तिघांपैकी कुणी तरी मधूनच वाक्य विसरत असे. मग ते ऐकण्यासाठी त्या 'कुणी तरी'ने मुद्दाम एखाद्या प्रेक्षकाच्या लक्षात येईल अशा, बहाण्याने भिंतीजवळ जाणे, बाकीच्या दोघांची मग त्याला सावरून घेण्यासाठी चाललेली धडपड आणि त्या केविलवाण्या प्रयत्नातून होणारी सगळ्याचीच पडापड या गोष्टी फारच खटकल्या. एखाद्या पात्रावर असताना अन्य पात्रावर संपूर्ण काळोख नसतो; त्यामुळे त्याच्या हालचाली प्रेक्षकांच्या लक्षात येत असतात अशा वेळी इतर पात्रानी स्टिल घेऊन थाबणे हा संकेत व्यावसायिक रंगभूमीवर मुरलेल्या कलाकाराना तरी माहीत हवा. की, 'असल्या फालतू गोष्टी आमच्यासारख्या मातवर नटानी धुडकावण्यासाठीच असतात,' असा त्याचा दावा आहे? शिवाय नाटक चालू शॉट असता विंगेतील माणसांचे दर्शन, खिडक्या – दारासमोरून बॅक स्टेजच्या लोकांची चालणारी वर्दळ हा सगळा अतिरेकी व्यावसायिकपणातून आलेला अतिसहज निष्काळजीपणा असावा.

नेपथ्य, संगीत, प्रकाश इत्यादी कोणत्याही बाबतीत आवर्जून लिहावे असे काहीही नाही.

एकूणच लेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि अन्य तंत्रज्ञांपासून साऱ्यानीच 'बाईसाहेब' हे नाटक मनापासून उरकलेले दिमते.

—सदानंद बोरसे

(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

# पैसे दुप्पट करण्याचा हा मार्ग नव्हे!



भविष्याचा भरवसा काय ?
पैसे दुप्पट आणि तेही नशिबाच्या भरवशावर
तर कधीच नाही. महाबँकेच्या बचत
खात्यातच तुमच्या पॉवरफुल ग्रहांची
लक्षणे दिसणार. बचतीवर व्याज म्हणजेच
शुभग्रहांचा एकत्र योग.

पॉवरफुल बचतीसाठी......

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी : ''लोकमंगल'' शिवाजीनगर
पुणे-४११ ००५

R.A. ADVTG.